# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००६ |
| वर्ष | : | सातवे |
| अंक | : | ६ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १०५**

MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष सातवे/अंक ६/मे २००६

## संपादकीय

आयुष्यात यशस्वी व्हायचं असेल तर चार गोष्टी फार महत्वाच्या आहेत. एक म्हणजे वेग, दुसरी निर्मिती क्षमता व कल्पकता, तिसरी कार्यपद्धतीतील गुणवत्ता आणि चौथी एकूण पद्धतीतील स्वत:ला तपासून पहाण्याची, स्वत:चे आत्मपरीक्षण करण्याची क्षमता' असं मत या महिन्यात महाविद्यालय परिसरात येणारे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्यवस्थापन शास्त्रातील "गुरु" एन्. आर्. नारायण मूर्ती यांनी त्यांच्या एका प्रदीर्घ मुलाखतीत व्यक्त केले आहे. इन्फोसिस चे कार्याध्यक्ष व मुख्य अधिकारी असणाऱ्या मूर्तींनी या प्रदीर्घ अशा मुलाखतीत आपल्या एकंदर यशाचे, इन्फोसिस च्या वाटचालीचे मूल्यमापन तर केलेले आहेच, पण त्याच बरोबर आपले जीवन विषयक तत्त्वज्ञानही प्रभावीपणाने मांडले आहे. त्यांच्या लहानपणात आजोळी व त्यांच्या कुटुंबात त्यांना मिळालेले प्रेम व जिव्हाळा याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केलेला आहे. कुटुंबात असणारा संवाद व एकमेकांशी वागताना असणारा जिव्हाळा यातून त्यांच्यात विलक्षण असा आत्मविश्वास निर्माण झाला.

नारायण मूर्ती हे नाव आज फार मोठे आहे. यामागे लहानपणातले दिवस महत्त्वाचे आहेत. कौटुंबिक पर्यावरण व वातावरणात त्यांना लाभलेली सुरक्षितता व संस्कार महत्वाचे आहेत. या वस्तुस्थितीचा आजच्या पालकांनी विचार करावयास हवा.

इन्फोसिसच्या आजच्या यशात व उभारणीत महत्त्वाचा वाटा आहे, तो 'परस्पर विश्वासाचा' असे ते म्हणतात. संस्थेतील वातावरण एखाद्या कुटुंबासारखे असावे यावर त्यांनी भर दिला. दुसरा आपल्याशी असहमत असू शकतो, त्याचे मत त्याला व्यक्त करण्याचा अधिकार आहे कारण काही मुद्यांवर कुटुंबातही जसे मतभेद असतात तसेच संस्थेचे ही आहे. 'मूल्य' विचार हा फार महत्त्वाचा आहे.

या मुलाखतीच्या शेवटी नव्या आंतरप्रुनर्सना (उद्योजक) सल्ला देताना त्यांनी सांगितले आहे की कठोर परिश्रम करा आणि निर्मितीक्षम व प्रामाणिक रहा. आपल्या सहकाऱ्यांवर विश्वास ठेवा. ते असेही सांगतात की ग्राहकांचे समाधान, कमी किंमत, निर्मिती, ग्राहकांशी संपर्क या काही बाबी तुम्हाला फायदा मिळवून देतात.

महाविद्यालय परिसरातील डॉ. वा.ना. बेडेकर संशोधन व व्यवस्थापन संस्थेच्या ग्रंथालयातील 'बिझनेस गुरुज् स्पीक' या पुस्तकात (दाखल अंक ५४५८) उपरोक्त प्रदीर्घ मुलाखत (पृ. ७४ ते ९१) आहे. या मुलाखतीत इन्फोसिस बद्दल त्यांनी खूप काही सांगितले आहे. त्यांच्या जीवनविषयक विचारांच्या मथितार्थाचा वेध येथे घेतला आहे. परिसरातील सर्व संस्थांतर्फे त्यांचे मन:पूर्वक स्वागत!



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सातवे / अंक ६ / मे २००६

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १० वे / अंक ११वा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | 'आत्मस्फूर्ति' दाय नेम 'मूर्ति' | प्रा. कीर्ति आगाशे | ३ |
| २) | श्री समर्थ रामदास | शं.बा. मठ | ५ |
| ३) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | यशवंत साने | १० |
| ४) | गीतासागर | आशा भिडे | १८ |
| ५) | प्रत्येकानं हे वाचायलाच हवं | मंजिरी दांडेकर | २२ |
| ६) | वेध माहितीच्या उत्क्रांतीचा व विनियोगाचा | स्वप्ना बाबुराव वर्तक | २४ |
| ७) | ध्येयपूर्ती हेच जीवन | प्रसन्न गोविंद कुलकर्णी | ३२ |
| ८) | मेंदू विषयक संशोधन व शिक्षण (भाग २) | विशाखा देशपांडे | ३४ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३८ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# 'आत्मस्फूर्ति' दाय नेम 'मूर्ति'

*श्री. नारायण मूर्ती यांच्या पत्नी सौ. सुधा मूर्ती या उत्तम लेखिका आहेत. श्री. नारायण मूर्ती आमच्या महाविद्यालयात येत आहेत. त्या निमित्ताने सुधा मूर्ती यांच्या साहित्यावरचा हा विशेष लेख. - संपादक.*

गेल्या तीन-चार वर्षांत जे काही साहित्य वाचनात आलं, त्यातलं सहज, सोप्या भाषेत संवाद साधलेले आणि वयाची अट न ठेवता कोणीही आस्वाद घेऊ शकेल असं लक्षात राहिलेलं साहित्य प्रा. सुधा मूर्ती यांचं !

'डॉलर बहू' ही त्यांची कांदबरी वाचून पूर्ण केल्याशिवाय खाली ठेवणं जड जात होतं. सुधाताईंनी कदाचित वाचकांची ही अडचण ओळखली असावी. त्यानंतर 'वाईज अँड अदर वाईज' आणि गोष्टी माणसांच्या हे त्यांचे भाषांतरित कथासंग्रह आले. वाचकांनी पण या कथासंग्रहांना उदंड प्रतिसाद दिला.

या कथा अगदी सामान्यांपासून असामान्य व्यक्तिंच्या जीवनातले छोटे-छोटे प्रसंग फुलवतात. जगण्याला आवश्यक असलेला आशावाद दाखवत असतानाच, व्यवहाराचे ज्ञान आणि वास्तवाचे भान पण समजावतात. सुधा मूर्ती या, कर्नाटकातील हवेरी जिल्ह्यातील शिग्गाव या छोट्या खेड्यात जन्मलेल्या एका मनस्वी संवेदनशील, कर्तबगार आणि संस्कारपूर्ण व्यक्तिमत्वाची ही जीवनशैली आपल्या मन:पटलावर अलगद उतरत जाते. आजीवर जीवापाड प्रेम करणारी, तिची शिकण्याची इच्छा ओळखून तिला वाचायला शिकवणारी आणि बक्षिसाचं पुस्तक भेट देणारी निष्पाप नात, नात्यांची घट्ट वीण सांभाळताना इथे दिसते. आजोबांना अजाणत्या वयात, एकातरी वाचनालयाला पुस्तकं देण्याचं वचन देणारी आणि जाणतेपणी त्या वाचनाची असंख्य पटीत पूर्तता करत, दहा हजार वाचनालयं बांधणारी ही नात, डोळ्यांच्या कडा भिजवते.

आई, वडिल, आजी-आजोबा यांच्या संस्कारांची शिदोरी त्यांनी दिलेल्या सामाजिक बांधिलकीची जाण, संकटकाळी धैर्यानं आणि हसतमुखानं सामोरं जायला दिलेली मानसिक जिद्द, याचा यथार्थ अभिमान इथे जाणवतो.

प्रा. सुधा मूर्तींनी इतर असंख्य पर्याय असतानाही प्राध्यापकी आणि विद्यादानाचा पेशा मनापासून स्वीकारला. हा पेशा वाटतो तेवढा सोपा नाही. कोवळ्या, स्वप्नाळू महत्त्वाकांक्षी, चंचल अशा कितीतरी विद्यार्थ्यांचं भविष्य घडवण्याची जबाबदारी इथे घ्यावी लागते. त्यासाठी या तरुण पिढीत मिसळावं लागतं, त्यांना समजून घ्यावं लागतं, त्यांच्या समस्या स्वत:च्याच मानून सोडवाव्या लागतात. याचवेळी चंगळवादापासून त्यांना अलगद बाजूला नेत, कर्तव्याची, जबाबदारीची आणि देशप्रेमाची जाणीव त्यांच्या मनात खोल रुजवावी लागते. खरं-खोटं, योग्य-अयोग्य, नीति-अनीति यांचा समतोल त्यांना पटेल असा समजवावा लागतो. वर्गात, छोट्या छोट्या गोष्टींचे दाखले देत ही तत्त्वे तरुण पिढीच्या गळी उतरवणारी प्राध्यापिका या सर्व कथानकांमधे दिसत राहते.

बहुसंख्य प्राध्यापक शिक्षक मंडळींची नवीन पिढीबद्दल थोडीफार तक्रार असतेच. त्यात भारताचा इतिहास सणांचं उत्सवांचं महत्त्व फार काय शिक्षक दिनाच महत्त्व मुलांना माहीत नाही हे विषय असताच. पण त्याची जबाबदारी शिक्षण म्हणून घेण्याची आणि आपल्या वर्तनातून मुलांपुढे उदाहरण घालून देण्याची तयारी आज किती प्राध्यापक घेतात ? सुधा मूर्तींचे 'प्राध्यापक' म्हणून अशा गोष्टींमधून वेगळेपण दिसतं.

वेगानं धावणाऱ्या जगात यशस्वी होताना, आपल्या कामाबद्दल विश्वास, श्रध्दा, प्रामाणिकपणा आणि तळमळ जागृत ठेवणं, आय.टी. सारख्या झटपट श्रीमंत करणाऱ्या क्षेत्रात पण, नीतिमूल्यांना धरुन, यशाच्या एक एक पायऱ्या चढणं कसं आवश्यक आहे हे सुधा मूर्ती प्रभावीपणे मांडतात. हे वाचताना जाणवतो तो सुधा ताईंचा शिक्षण क्षेत्रातला प्रदीर्घ अनुभव आणि तरुण पिढीला संस्कारक्षम करण्याची तळमळ.

काही व्यक्ती भाग्यवान अशासाठी असतात, की त्यांच्या आयुष्यात नशीबाने, हिमालयाएवढ्या कर्तृत्त्ववान माणसांचा सहवास त्यांना मिळत राहतो. आपल्या आयुष्यात योग्य गुरु, पालक, शिक्षक, उत्तम संगत मिळणं हे एक पूर्वसंचित असतं. जे.आर.डी.टाटा, डॉ. अब्दुल कलाम यांच्यासारखी अद्वितीय व्यक्तिमत्त्व सुधाताईंना जवळून पहायला मिळाली. जे. आर. डी टाटांचा समाजाचं ऋण समाजाला परत करा हा संदेश सुधाताईंनी मनावर कोरला. त्याच्या पूर्ततेसाठी, **'विभाग प्रमुख' पदभाराचा त्याग करुन फक्त विद्यादानाचं काम त्यांनी स्वीकारलं आणि 'इन्फोसिस फौंडेशनची फाऊंडर ट्रस्टी' होऊन त्यांनी समाजकार्याला वाहून घेतलं.** असंख्य व्यक्ती, संस्था, गावं त्यांनी पाहिली. यातली व्यक्तिचित्रं, जीवना विषयींचे त्यांचे नितांत सरळ आणि सुंदर विचार या लेखांमधून आपल्याला अंतर्मुख करताना, आशावादी आणि आनंदी बनवतात.

त्यांनी रंगवलेला सह्याद्रीच्या जंगलातला ठंडाप्पा, 'काहीतरी दिल्याशिवाय घेऊ नका' किंवा 'घेण्यात सुद्धा मोठेपणा आहे' अशी जीवनाची सुंदर संस्कृती शिकवताना आपल्याला इथे भेटतो. हॉस्पिटल बांधलं म्हणून प्रेमानं मोगऱ्याचा गजरा देणारी गरीब वृद्ध स्त्री निष्पाप, निर्व्याज प्रेम आणि कृतज्ञता दाखवते. आपल्या देशातल्या दारुण गरिबीचं प्रतिनिधित्त्व करणारी, कुष्ठरोग्यांच्या वस्तीतली वीरम्मा अस्वस्थ करते. तंत्रज्ञान, आधुनिकता, फॅशन, सौंदर्यस्पर्धा याचे प्रतिनिधित्त्व करणाऱ्या भारत देशातील दारिद्र्याला सुधाताईसारख्या कितीतरी सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या व्यक्तिंची गरज आहे. हे मनोमन पटतं. अनेक कंपन्यांमधून उच्चपदस्थ अधिकारपद भूषवणारी कर्तबगार स्त्री समाजाच्या प्रतिष्ठित वर्तुळात वावर करणारी, उच्चविद्याविभूषित प्राध्यापिका जेव्हा अठरा विश्वं दारिद्र्यात राहणाऱ्या माणसांच्या दारात आरोग्य आणि शिक्षणाच्या सुविधा नेण्यासाठी धडपडते, तेव्हा या व्यक्तिमत्त्वाबद्दलचं कुतूहल आणि आदर दुणावत राहतो.

सुधा मूर्तींची महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणजे, नारायण मूर्ती. या कर्तृत्त्ववान आणि यशस्वी जीवन साथीदाराचे साहचर्य ! आय.आय.टी मधे जाण्याची गुणवत्ता मिळवूनही, केवळ आर्थिक परिस्थितींच्या मर्यादांमुळे प्रवेश घेऊ न शकणारा, एक तरुण विद्यार्थी, इतर मित्रांना रेल्वे स्टेशनवर निरोप देतो, हा प्रसंग नारायण मूर्तींच्या जीवनातला टर्निंग पॉईंट! 'आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मन:। या गीतेतल्या वचनाचे आचरण करत, स्वत:चे भविष्य घडवणारा एक जिद्दी, सुंसस्कृत तरुण अशी नारायण मूर्तींची ओळख मनाला स्पर्शून जाते.

स्वत:च्या दु:खांना अडचणींना कवटाळून न बसता आय.टी क्षेत्रात भारताकडे जगाचे नेतृत्व यावं असं सुंदर स्वप्न पाहणारे आणि हे स्वप्न साकारण्यासाठी धडपडणारे, द्रष्टे नारायणा मूर्ती आणि त्यांना समरसून साथ देणाऱ्या सहचारिणी सुधा मूर्ती इथे भेटतात.

हे सगळं एका ठिकाणी कसं सामावू शकतं? उपनिषदात 'चरैवेति चरैवेति।' असं प्राणशक्ति किंवा आत्मस्फुर्तिचं वर्णन केलं आहे. ही अंत:प्रेरणा, कोणीतरी सांगून किंवा शिकवून येण्याची गोष्ट नाही. ती दैवदत्त असावी लागते. ती प्रत्येक आत्म्यात असतेच ! फक्त काही नशिबवानच, त्यावरची धूळ पुसुन, तिला जागृत,

पृष्ठ क्र. ३३ वर

# श्री समर्थ रामदास

*शंकरराव मठांचा संत व संतजीवनाचा अभ्यास फार मोठा आहे. संत साहित्य व जीवनावर त्यांनी लेखन केले तर वाचकांना विचारांच्या नव्या दिशा लाभतील. रामदास स्वामींवरील लेखमालेस या लेखापासून प्रारंभ करीत आहोत. - संपादक*

**सांप्रत सामाजिक अवस्था**

भौतिकतेच्या आहारी गेलेल्या सांप्रतच्या समाजाचे चित्र उभे केल्यास प्रामुख्याने अंधश्रद्धा व स्वयंकेन्द्रियता आढळून येईल. आजच्या लोकांच्या व्यवहारातून बेतालपणे वागण्याचे अनेक प्रसंग घडत असताना आढळतात. जुनी जीवनमुल्ये नष्ट झाली, नवीन जीवनमूल्यांना आकार आलेला नाही. त्यामुळे मानवी जीवन यंत्रवत् जड झालेले आहे. पैसे गोळा करणारे यंत्र म्हणजे मनुष्य अशी मानवाची नवी व्याख्या बनू पाहात आहे. ही जडता, संभ्रमित अवस्था, वरवरुन आर्थिक स्वरुपाची जरी वाटली तरी ती दुबळ्या मानवी मनाची अभिव्यक्ती आहे. मानव भौतिकतेने संपन्न व मानसिकरित्या भणंग असे एकांगी जीवन जगत आहे. या मानसिक अनारोग्यावर, मानण्याचे, नीतीचे, ईश्वरभक्तीचे, धर्मभावनेचे, शाश्वत जीवनमूल्यांचे संस्कार-रसायन गुणकारी ठरेल. या साठी थोर महात्म्यांचे जीवनपट उलगडून पाहाण्याने आपणाला हे रसायन प्राप्त होईल. याचा शांतपणे विचार केल्यास उदात्त जीवनाकडे नेणारी जीवन दृष्टी आपणाला प्राप्त होईल. इतके भव्य असे कार्य संतांनी करुन ठेवले आहे. त्यांचे आपल्यावर फार मोठे उपकार आहेत.



**महाराष्ट्रीय संताची कामगिरी**

महाराष्ट्र समाज जीवनात ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास या पाच संत कविंनी केलेले कार्य अद्वितीय असेच आहे. हे पाच संत म्हणजे महाराष्ट्राचे पंचप्राण होत. यांचे साहित्य जनकल्याणासाठी निर्माण झाले. संतांनी गोडवाणीने सर्वांनाच परमार्थ शिकविला. परधर्म व परचक्र या उभयविध आक्रमणाविरुद्ध कोट उभा केला. हा कोट स्वसंरक्षणाचा होता. स्वधर्म, स्वभाषा, स्वराष्ट्र यांचा अभिमानाच्या अतूट धाग्यांनी सर्वांची हृदये एकत्र साधली. त्याचा एक अभेद्य तट बनविला. ही प्रमुख कामगिरी संतांनी केली.

**महाराष्ट्र धर्म जागविला**

जमीनीची मशागत करणाऱ्या नांगर चालविणाऱ्याकडे उपेक्षेने पाहणाऱ्या मनुष्याची दृष्टी ज्यावेळी त्याच शेतात हिरवी पिवळी धान्याची भरघोस कणसे चमकताना पाहून स्थिरावते, त्या वेळी त्याला आनंदाचे भरते येते. हाच भेद, हाच फरक भागवत संप्रदायी (वारकरी) संतांच्या कामगिरीत व महाराष्ट्र धर्म (धारकरी) सांप्रदायी श्री. रामदास सांप्रदायी कामगिरीत आहे.

समर्थकालीन श्री तुकोबाराया यांच्या अभंगातून काही प्रतीकारात्मक वचने आढळतात. उदाहरण द्यावयाचे झाल्यास या वचनांचा उल्लेख करावा लागेल. विंचू देव्हाऱ्यावरी आला । देव पूजा नावडे त्याला । एथ पैजाराचे काम । अधमासी तो अधम । 'किंवा दया तिचे नांव भूतांचे पाळण । आणिक निर्दाळण कंटकांचे । धर्म नीतीचा हा ऐकव्यवहार । सांगतसे भार निवडोनी ।'

तसेच 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदू ऐसे । भले तर देऊ कासेची लंगोटी । नाठाळाचे (माथी) पाठी हाणू काठी ।'

तथापि भागवत सांप्रदायी (वारकरी) संत वाङ्मयात, आचारात, वा उपदेशात समर्थांसारखे उघड व प्रगट प्रतिकार दिसत नाही. म्हणून साधारणपणे अवलोकन करणाऱ्या विद्वान लोकांना देखील समर्थ हे एकटेच देशकार्यार्थ झटणारे संत वाटतात. पण हे बरोबर नाही. वारकरी पंथांच्या संतांचे कार्य अतिशय मूलगामी आणि महत्त्वाचे होते. हे कदापि विसरुन चालणार नाही. समशेरीला समशेर भिडविणारे हात ज्या देहाचे, त्या देहाविषयी बेभानवृत्ती बाणविण्याचे अलौकिक कार्य या संतांनी केले. देहाच्या काय किंवा समाजाचा काय बाह्य शत्रूपेक्षा अंत:शत्रूशी झगडा करणेच मोठे कठीण व जिकीरीचे काम असते. वर उभ्या राहणाऱ्या इमारतीपेक्षा पाया भरण्याचे, कापणी करण्यापेक्षा जमीन नांगरण्याचे काम कष्टाचे व कालावधीचे तसेच जिकीरीचे परंतु अतिशय महत्त्वाचे - अशा प्रकारचे अलौकिक कार्य संतांनी करुन आडमार्गी लागलेल्या समाजाला मार्गी लावून पुढील कार्यासाठी येणाऱ्यांना मार्ग सुरळित करुन ठेविला. या गोष्टीचा समर्थांनी पुरेपूर उपयोग करुन घेतला. भागवत सांप्रदायी-वारकरी व रामदास सांप्रदायी-धारकरी यांचे कार्य परस्परांना पूरक ठरले. दोनही सांप्रदायाबद्दल कृतज्ञता भाव ठेवला पाहिजे.

अशा प्रकारे भागवतधर्म व महाराष्ट्रधर्म याची तुलना करुन पाहिल्यास पहिल्याची कर्तबगारी सात्त्विक, निवृत्तीपर, अंतरंग तयारीची, मनुष्य सुधारणेची होती तर दुसऱ्याची कर्तबगारी या सात्विकाच्या पायावर उभारलेली राजस वैभवाची इमारत ही प्रवृत्तिपर होती. या दोनही सांप्रदायातील उपास्य देवताकडे नजर टाकल्यास वारकरी सांप्रदायाचे दैवत कटीवर हात ठेवून उभा असलेला पंढरीचा विठ्ठल तर रामदासी सांप्रदायाचे दैवत धनुष्यबाण सज्ज असलेला कोदंडधारी श्रीराम असलेले आढळतील. हाच फरक या दोनही सांप्रदायातील विचारसरणीचा. मात्र हा फरक कालमानानुरुप केवळ वरवरचा होता. पंढरीत विठ्ठलाच्या दर्शनाला गेलेल्या समर्थांनी जेव्हा विठ्ठलाला आळविले व म्हटले- 'इथे कारे उभा श्रीरामा' आणि निजरुप दाखविण्याची विनवणी केली त्या वेळी भगवंतांनी तेही रुप विठ्ठलाच्या ठिकाणीच दाखविले. भजणारे भक्त व प्रभू एकच असतात हेच यावरुन ध्यानात येते. भक्तासाठी अनेक रुपे भगवंत धारण करतो ज्याचा जैसा भाव । त्याचा तैसा देव ।

### वारकरीच धारकरी बनले

भागवत सांप्रदायी प्रभूच्या हातात शस्त्र नसल्याचे कारण त्या संप्रदायातील संतांना आपापसातला झगडा प्रथम जिंकावयाचा होता, अशावेळी शस्त्राचा उपयोग क्वचित करावा लागतो. पण तेच परक्याशी झगडताना मात्र, धर्मरक्षणासाठी त्यांच्या तलवारीस तलवार भिडवावी लागते म्हणूनच महाराष्ट्र धर्मी प्रभू रामरायाच्या हाती धनुर्बाण विराजत आहे. उत्तरेकडे देखील पंजाब राज्यात शिखांनी प्रतिकाराचा कडवेपणाच स्वीकारला हे विदित आहेच. त्यांना शिखांची लढावू सेना बनवावी लागली. याचप्रमाणे टाळ मृदंग यांच्या मंजुळ ध्वनीला बाजूला सारुन समशेरीची खणाखणी समर्थांना करावी लागली. हा काल महात्म्याचा परिणाम व परिस्थितीतला फरक आहे. पण दोहोतही एकच तत्त्व आपणास दिसते. इथे ही गोष्ट आवर्जून लक्षात ठेवावी.

हाती माळ घेतलेल्या श्री गुरु नानकांइतकेच कृपाण घेतलेल्या श्री गुरु गोविंद सिंहांच्या व त्यांच्या लढावू शीख जमातीच्या अंत:करणात 'सत् श्री अकाल' ह्याच मंत्राचे प्रेम दुमदुमत होते. तसेच पंढरीच्या वाळवंटावर टाळमृदंगाच्या ध्वनीच्या ठेक्यावर नाचणारे वारकरी खड्ग धारण करुन वीरश्रीची गाणी गात रणक्षेत्राचा तीर्थावर समशेरीच्या तालावर नाचले तेव्हा दोघांच्याही अंतक:रणात

एकाच भगवंताची मंगलमूर्ती विराजमान झालेली होती. धर्म, पंथ, किंवा चळवळ कोणाचीही असो, भगवंताचे अधिष्ठान आधी असले पाहिजे. त्या सात्विक पायावरच इमारत उभी राहिली पाहिजे. हे उभयतांनाही अगत्याचे वाटले. म्हणूनच त्यांची चळवळ एवढी समर्थ होऊन यशस्वी झाली. महाराष्ट्र धर्माचे ढोबळ स्वरुप हे असे होते. या धर्माचे प्रणेते श्री समर्थ रामदास, त्यांच्या जीवन कार्याचा विचार निश्चितच बोधप्रद ठरेल.

### संक्षेपाने जीवन व कार्याची रुपरेषा

श्री रामदास स्वामी शके १५३० साली जांब गावास जन्मास आले. श्री समर्थ वयाच्या बाराव्या वर्षी - (शके १५४२) बोहल्यावर उभे राहिले. मातोश्रींना दिलेले वचन पाळले. सावधान हा शब्द कानी पडताच लग्न मंडपातून जी धूम ठोकली ते परत तेथे आले नाहीत. या बालवयातच त्यांच्यात ही चमक दिसली. पुढील काळी सबंध महाराष्ट्र ज्यांनी आपल्या ओजस्वी आणि तेजस्वी वाणीने गदगदा हलवून सोडला व त्यास सावध केले, त्यांनी बालवयातच सावध व्हावे हेच उचित होते. त्या बालमूर्तीत एक प्रकारची चमक होती. त्यामुळेच वाढत्या वयाबरोबर कर्तबगारीची कक्षा शुक्ल पक्षाच्या चंद्रकलेप्रमाणे विस्तारित झालेली आपणास पाहावयास मिळते.

समर्थ जांबहून निघाले ते प्रथम नाशिक पंचवटीस आले. त्यांनी तेथे बारा वर्षे पुरश्चरण केले. भावी कार्यास प्रभू रामरायाचा आदेश घेतला. थोडक्यात पुढील चळवळीसाठी भगवंताचे अधिष्ठान प्राप्त करुन घेतले. नित्य नदीचे शीतल स्नान करावे, सूर्यनमस्कार घालावेत, यामुळे शरीर बळकट बनले. त्यांच्या त्या पीळदार शरीरावर ब्रह्मचर्याचे तेज ओसंडू लागले. अशी चोवीस वर्षांची ती तेजस्वी मूर्ती तीर्थाटनास बाहेर पडली. त्यांनी मधुकरी वृत्ती स्वीकारली आणि मधुकराप्रमाणेच ठायी ठायी असणाऱ्या लोक समुदायांची वृत्ती परीक्षून सोडली.

तीर्थयात्रा करण्याच्या मिषाने देश परिभ्रमण केले. बारा वर्षे यात्रा करुन देश पालथा घातला. बारा ज्योतिर्लिंगे, चारधाम, तीर्थक्षेत्र पहात ते हिंडले. त्यात त्यांना काय दिसले. यावनी सत्तेची धुंद झालेल्या महंमदी धर्मानुयायांनी घातलेला नंगा नाच जागोजागी त्यांच्या दृष्टीस पडला. त्या तेजस्वी देशभक्तास या सर्व गोष्टींचा संताप आला व ओजस्वी वाणीने म्हटले - धर्मासाठी मरावे । मरोनी अवघ्यासी मारावे । मारता मारता घ्यावे । राज्य आपुले । शरीर सामर्थ्याचे, ब्रह्मचर्याचे, रामभक्तीने, बुद्धी कौशल्याचे व उदंड कष्ट करण्याचे तेज त्यांच्या नसानसातून भिनून राहिले होते.

### तीर्थाटनातील अनुभव

समर्थांना तीर्थाटणात त्यांच्या सारख्या विचारांनी भारलेले तरुण दिसले नाहीत. महंमदी लोकांच्या अत्याचारापेक्षाही समाजाच्या या शारीरिक व मानसिक अंतर्गत नामर्दपणाकडे पाहून त्यांचे हृदय विदीर्ण झाले. समाजात असलेला भ्याडपणा, दुबळेपणा, आत्मविश्वासाचा अभाव जागोजागी दिसत होता. हे सारे अवलोकन करुन भगवंतानी अर्जुनाला केलेला उपदेश त्यांना आठवला आणि ते समाजाला उद्देशून म्हणाले - 'क्षुद्रं हृदय दौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ' स्वधर्म, स्वराष्ट्र रक्षणार्थ मेलात तरी बेहत्तर पण कुत्र्याच्या मोलाने मरु नका. अशा तऱ्हेचा जिवंत उपदेश त्यांनी ठिकठिकाणी केला. प्रयत्नांची पराकाष्ठा केली. सबंध महाराष्ट्र देश त्यांनी आपल्या तेजस्वी वाणीने हालवून सोडला. आणि खडबडून जागा केला. त्या महाराष्ट्राकरवी स्वधर्म, स्वराष्ट्र प्रतिष्ठापनेचे दिव्य व अलौकिक कार्य करविले. त्यासाठी त्यानी महाराष्ट्र धर्माची - रामदासी पंथाची स्थापना केली.

तीर्थाटन करताना समर्थांना आपल्या अंतर्भेदी दृष्टीला दोन प्रकारच्या अरिष्ट गोष्टी संपूर्ण हिंदुस्थानभर दिसून आल्या. एक-मुसलमानांचा धार्मिक, राजकीय, नैतिक अत्याचार व दुसरे - त्याहूनही भयानक, हिंदू समाजात

शिरलेला भ्याडपणा व दुबळेपणा. या बद्दल खेदाचे उद्‌गार समर्थांनी दासबोधात काढले आहेत. या व्यतिरिक्त एक मोठी अडचण महाराष्ट्रात त्यांना आढळली ती म्हणजे यवनदासांची. मोठमोठे मराठे सरदारकीच्या पाशात स्वत:ला गुंतवून यवनांसाठी लढून आपलाच मुलूख त्यांच्या घशात घालीत होते. अशा प्रकारे ही मंडळी स्वजनांचेच गळे घोटीत होती. घाडगे, निंबाळकर आदी तुल्यबळ सरदार मोंगलाचे सेवक बनले होते. त्यांना शुद्धीवर आणावे लागले. शिवरायांनी या सरदाराना आपलेसे करुन घेण्याचे कार्य हाती घेतले आणि चाकणचा फिरंगोजी नरसाळा याला आपलेसे केले.

## आणखी काही नमुने

समाजातील आणखी एका वर्गाचा अनुभव समर्थांना आला. हाताने थोडीही कृती न करता स्वदेश प्रेमाच्या, स्वधर्मविषयीच्या आणि स्वार्थत्यागाच्या नुसत्या गप्पा मारणाऱ्यांचा समर्थांना खेद वाटे. प्रसंगी चीडही येई. दासबोधात ते म्हणतात - करंटे मिळाले सर्व । जो तो बुद्धीच सांगतो. बोलण्याप्रमाणे कृती करण्यात किती अद्‌भुत सामर्थ्य आहे हे यांना कधी कळणार ?

या शिवाय स्वत:च्या स्वार्थासाठी देशहितावर अंगार ठेवणारे दुर्मतिपण तीर्थाटणातून दिसून आले. या प्रमाणे बारा वर्षाच्या तीर्थयात्रेतून सूक्ष्म अवलोकन करणाऱ्या समर्थांना विविध प्रकृतीचे, विविध ढंगाचे लोक, तसेच देशाची दैन्यावस्था आढळून आली. देहाने आणि मनाने नामर्द बनलेली, स्वार्थासाठी हपापलेली, यवन दास्यत्वामुळे सत्व घालवून बसलेली, देशभक्तीच्या आणि धर्मभावनेच्या कोरड्या गप्पा मारणारी, निसत्व मंडळी आपल्या भोवती वावरताना पाहून आणि त्यातच देशावर तुळशीपत्र ठेवणारे महाभाग पाहून समर्थ व्यथित झाले.

## एकांत सेवन व चिंतन

आपली तीर्थयात्रा संपवून बारा वर्षानंतर शके १५६६ साली समर्थ चाफळ खोऱ्यात कृष्णाकाठी येवून राहिले. प्रयत्नांची कास धरणारे समर्थ, पण त्यांनाही हा सारा प्रकार पाहून विषण्णता आली. साहजिकच त्यांच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले 'उदास वाटते जीवि । आता जावे कोणीकडे ।' काय करावे म्हणजे या कर्दमातून लोक बाहेर पडतील. उन्नती करण्यास तयार होतील. हाच एक विचार रात्रंदिवस त्यांना अस्वस्थ करु लागला. एकांतात चिंतन सुरु केले. एकांत मानला ज्याला । त्याला साधे हळुहळु । राम घळीत एकांताचा आश्रय घेतला.

## एकांतातील विचार मंथन

समर्थांनी समग्र देशभर पर्यटन केले. आपल्या देशाची अवस्था त्यांच्या पूर्णपणे ध्यानात आली. त्यात त्यांना एकच आशेचा किरण दिसला. भावी कार्याच्या सिद्धीने त्यांना आनंद झाला. त्यांची विषण्णता नाहीशी झाली, तो आशेचा किरण म्हणजे भागवत संतांच्या आजवरच्या कामगिरीने महाराष्ट्र जनतेत निर्माण केलेल्या स्वधर्म प्रेमाचा व हरिभक्तीचा होय. संपूर्ण महाराष्ट्रात सर्व सामान्यपणे तेथील जनतेची अंत:करणे भागवत सांप्रदायी संतानी आपल्या दिव्य व अलौकिक कार्याने भारून टाकली होती. आपल्या प्रेमळ वागणुकीने अगदी तळागाळातील लोकाना देखील या संतांनी त्याना परधर्मापासून मागे खेचून धरले. समाजात पसरलेली आत्मघातकी स्वार्थलोलुपतेची कीड नष्ट केल्यास यावनी सत्तेच्या बाह्य आघाताने होणारे घाव बुजवून टाकणे फारसे कठीण नाही, कारण प्रभु प्रेमाची, भगवद्‌भजनाची गोडी अद्याप सामान्यजनात कायमच होती. हीच आशा हृदयाशी धरून महाराष्ट्र धर्माची मुहूर्तमेढ समर्थांनी केली. हा महाराष्ट्र धर्म देखील भागवत धर्माप्रमाणेच हरिभक्तीच्या पायावरच उभा केला - समर्थ म्हणतात.

मुख्य हरिकथा निरुपण । दुसरे ते राजकारण ।
तिसरे ते सावधपण । सर्व विषयी ॥११।५।४

हरिकथा निरुपण। नेमस्तपणे राजकारण।
वर्तायाचे लक्षण । ते ही असावे । ११।६।४

हरिकथा निरुपण। बरेपणे राजकारण । प्रसंग
पाहिल्याविण। सकळ खोटे ।१२।२।२९

**कार्यवाहीस प्रारंभ**

समाजाच्या अंतरंगात ज्या शुद्ध, निर्मल प्रभुप्रेमाच्या भक्तीचा झरा वाहात होता त्यालाच प्रथम समर्थांनी हात घातला. अशा समग्र भक्तांना एकत्र केले. त्यांना भक्तीचे निर्मल उदक प्राशिले, आणि त्यांना सचेतन केले. मगच चतुरतेने राजकारणाचा खुराक अत्यंत स्नेहपूर्णतेने खाऊ घातला. आध्यात्माच्या पायावरच कोणाच्याही कर्तबगारीची भव्य इमारत दिमाखाने उभी राहाते; हे समर्थ जाणून होते. दासबोधाचे वर्णन करताना त्यानी या विषयी सूचक उद्गार काढले आहेत. भक्ताचिया साभिमाने । कृपा केली दाशरथीने । समर्थ कृपेची वचने। तो हा दासबोध । २०।१०।३० अशा तऱ्हेच्या समर्थ कृपेचे तेजस्वी रसाळ वचनामृत समर्थांनी सर्वांसाठी निर्माण करुन ठेवले आहे.

समर्थांनी महाराष्ट्र धर्माला एक पक्की बैठक निर्माण करुन दिली. ही बैठक आध्यात्मिक होती. समर्थ विवेचन करतात - आमुचे कुळी रघुनाथ। रघुनाथे आमुचा परमार्थ। जो समर्थाचाही समर्थ। देवा सोडविता। त्याचे आम्ही सेवकजन। सेवे करता झाले ज्ञान। तेथे अभाव धरिता पतन। पाविजेल की। ६-७-२१ व २२

करी दुर्जनाचा संहार । भक्तजनासी आधार।
ऐसा तो हा चमत्कार। शेकडा चाले । ६-७-२९

मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासोनि जाते।
कृपा केलिया रघुनाथे । प्रचीत येते । ६-७-३०

**कार्यकर्त्यांची जडण घडण**

आधी देश की आदेश? या प्रश्नाचे उत्तर देताना समर्थ म्हणतात - आधी परमात्म्याचा आदेश ग्रहण करावा, मग देश रक्षणाकडे वळावे. हे प्रभूकार्य म्हणून केल्यास या कार्यात यशच मिळेल. भक्त तेजस्वी होईल. येथे आदेशाचे पालन न केल्यास ते प्रभूचे कार्य न झाल्याने पतन होण्याची शक्यता निर्माण होईल. अंतर्बाह्य त्या प्रभूच्या ठिकाणी भक्तीने, प्रेमाने गुंगून गेल्यास त्या प्रभूचे तेज खेळू लागेल. त्या तेजाने भक्त विजयी होईल. लक्ष्मीच्या वैभवाने सर्व जग धुंद होऊन जाते पण प्रत्यक्ष लक्ष्मीपतीलाच, नारायणालाच, आपलेसे केल्यावर विश्ववैभव प्राप्त झाल्या वाचून राहणार नाही. यासाठी भगवंताचीच कांस धरावी समर्थ म्हणतात. तया नारायणाला मनी। अखंड आठवावे ध्यानी । मग ती लक्ष्मी त्या पासोनी जाईल कोठे। (१५/९/२४) आणखी समर्थ म्हणतात - त्या हृदयस्थ आत्मारामाच्या कृपेवरच विचारांचे वरदान प्राप्त होते. समजणे जे विवेकाचे। तेही आत्म्याविण कैंचे। कोणी एके जगदीशाचे। भजन करावे । १६/१०/२७ प्रभूच्या उपासनेची आणखी कारणे विशद करतात. - त्या प्रभूचे कृपाछत्र, त्या प्रभूचे अभयकर, आपल्या मस्तकी असल्यावर सारी विघ्ने नाहीशी होतात आणि भक्ताच्या ठायी अलोट सामर्थ्य संचारते. मग त्याच्या कडे काळ देखील वाकड्या नजरेने पाहावयास घाबरतो. समर्थ म्हणतात - समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्वभूमंडळी कोण आहे? राम आपल्या भक्ताची कधीच उपेक्षा, करीत नाही. त्या भगवंताच्या अधिष्ठाना वाचून, त्याच्या उपासने वाचून सर्व सामर्थ्ये सर्व चळवळी, सर्व खटपटी, व्यर्थ आहेत. म्हणून ते स्पष्टपणे सांगतात. सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे। परंतु आधी भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे २०/४/२६ कारण देव आणि भक्त एकवटल्यावर त्या उभयतांच्या सामर्थ्यापुढे काळाचेही काही चालत नाही.

मुख्य हरिकथा निरुपण । हे झाले, दुसरे ते राजकारण। तिसरे ते सावधपण । दास बोधाचा अभ्यास

पृष्ठ क्र. १७वर

# भारतीय संस्कृती-बीज, मॉडिल व साधना

*वैश्विक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा लेख, विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती - संपादक*

## सत्य, सात्विक भारतीय संस्कृति

भारतीय संस्कृतिचे एक आगळे वेगळे विलोभनीय व 'सत्य, सात्विक' असे स्वरुप आहे. ह्या संस्कृतिची 'दिशा' कोणती ? भूमिका काय ? अनेक प्रश्न आणि अनेक उत्तरे दिली जातील.

## वैश्विक योजना

पण, आजवरच्या इतिहासावरुन निष्कर्ष काढावयाचा असेल, तर 'प्राणी स्तरावरील मानवाला' आध्यात्मिक उन्नतिच्या मार्गावर नेणारी, मानवाच्या जन्मसिद्ध मनाला एका विवक्षित पद्धतीने, सात्विकतेकडे, दैवी गुणांकडे नेणारी, ही, ह्या पृथ्वीवरील एक 'मानवी संस्कृति' आहे, हे निर्विवाद आहे. ह्या सगळ्या वैश्विक कार्याला आखून, नेमून दिलेला नकाशा, योजना, साधने वगैरे, ह्या संस्कृतिने, युगानुयुगे व पिढ्यानपिढ्या जपली आहेत - संभाळली आहेत - संरक्षण व जतन केली आहेत.

## मानवाचे नेतृत्त्व नैसर्गिक

निसर्गाचाच एक प्रमुख अंग असलेला हा मानव ह्या सर्व निसर्गातील घटकांचा एक जबाबदार व प्रतिभावान, प्रज्ञावान 'नेता' आहे.

पण, त्याला त्याच्या 'जन्मसिद्ध जडत्त्वाचा' दोष आहे. आणि त्या जड, दर्शनाला 'खऱ्या' वस्तुस्थितीची, ध्येयाची, निसर्गाच्या व स्वत:च्याही खऱ्या भूमिकेची बिलकूल जाणीव नाही. त्याच्या मर्त्य देहाच्या 'पिंजऱ्यात त्याला मर्यादा आहेतच, पण त्याचबरोबर दैवी योजनेने निसर्गदत्त योजनेने, ह्या मर्यादांवर मात करण्याची गुप्त, निद्रिस्त साधने व शक्तिसुद्धा आहेत. त्याचे विश्वदर्शन 'अर्जुन' महाभारत व भगवद्गीतेतील इतकेच सामान्य आहे - महाभारतात, ह्या अर्जूनाला जे 'खरे, सत्य व विश्वदर्शन' भगवान श्रीकृष्णाने दिले, असे आपल्याला सांगितले आहे - व्यासमूनींनी - तसे दर्शन, आजही ह्या मर्त्यदेहाच्या आधुनिक मानवाला नाही. पांडित्यपूर्ण असेलही पण अनुभूती व बोधज्ञानात नक्कीच नाही !!

जड विज्ञान, म्हणजे फिजीक्स, मॅथमॅटिक्स, स्पेस, सायन्स, कॉसमॉलॉजी, संगणकशास्त्र, जडवादी तत्त्वज्ञान व ह्या तऱ्हेच्या अनेक 'अविद्या', ह्या त्याला ही 'कॉस्मिक रिॲलिटी' देऊ शकणार नाहीत ही काळ्या दगडावरची रेघ आहे. त्याची कारणे मी इतरत्र मांडलीच आहेत.

## मेधावी संस्कृति

तेव्हां ह्या 'भारतीय संस्कृतिने' निर्मिलेली 'मेधाजनन' साधना उपयुक्त आहे. 'उपनयन' ह्या १६ संस्कारातील या एका साधनेने, प्रत्येक मानवाला ही मेधा प्राप्त व्हावी हा हेतू बाळगला आहे.

ही साधना 'दिशाच्या' मागील अंकात पुष्कळश्या रहस्य निवेदनाच्या पद्धतीने वर्णिलेली आहे. ही 'मेधाशश्मि', जन्मजात नसते, तर गायत्री मित्राच्या साधनेने सूर्यापासून मिळवावयाची असते. काय करते ही 'मेधा'?

उपनयन संस्कार 'मेधाजनन' करण्यासाठी केला जातो.

''यामृषयो भूतकृतो मेधां मेधाविनो विदुः।
तथा मामद्य मेधयाग्ने मेधाविनं कृणु ॥
अथर्ववेद, ६-१०८-४''

''मंत्रद्रष्टे ऋषि, आणि ज्यांच्या ठिकाणी पृथिवी, आप, तेज, वायु आणि आकाश ही पंचमहाभूतें निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे, असे कारयप, विश्वमित्रादि बुद्धिमान ऋषि, हे ज्या मेधेला जाणतात त्या मेधेने युक्त असा मी व्हावे, अशी हे अग्निनारायणा, तुला प्रार्थना आहे''

ह्या 'मेधाजनन' मध्ये 'पळसवृक्षाचा' वापर आहे. 'पळस किंवा 'पलाश' ह्याला 'वेदाचे ज्ञान - म्हणजे योग्य तऱ्हेने श्रवण करण्याचे सामर्थ्य आहे, असा ऋषीमुनींचा दावा आहे. त्यावर भारतीय संस्कृतिचा विश्वास आहे. ह्या पळसवृक्षाला श्रुतीज्ञानात 'सुश्रवा' असा किताब आहे.

**Bio-Plant Radar**

डॉ. जगदीशचंद्र बोस यांनी ज्या पद्धतीची 'संशोधन दिशा' हाताळली होती, तिच्याबद्दल आज बिलकुल आस्था नाही आहे. पण, वनस्पतींना संवेदनशक्ति असते. असे तिचे सामर्थ्य भौतिक पातळीवर सिद्ध करण्याचे प्रयोग झाले.

भारतीय संस्कृतित 'विज्ञाना'च्या वेगवेगळ्या स्तरावर, हा प्रयोग योजिला आहे.

भारतीय संस्कृतित हा 'उपचार' (रहस्यमय) वैश्विक ऋग्वेदीयन 'अग्नि', गायत्री मंत्र व मानवी मनावर काही विशिष्ट सामर्थ्य देणाऱ्या मंत्रशक्ति व योगविज्ञानाच्या द्वारे केला जातो.

**असहिष्णु समाज**

हे खरे आहे कीं, आजमितीला ह्या क्रिया, एका चैतन्यरहित, विश्वास रहित, अशास्त्रीय, अज्ञानी, शुष्क व बहिर्गत 'शोमनशिप' Showmanship ह्या 'पाश्चात्य संस्कारांनी', पार पाडल्या जातात. सध्याचा समाज-भारतातच-ह्या आध्यात्मिक उद्दिष्टांबद्दल, संस्कार क्रियेबद्दल व 'वेदज्ञानाबद्दल' असहिष्णु, अश्रद्ध झाला आहे, आणि ह्या संस्कृतिचा इंस्टिट्यूशनल (संस्थात्मक) जबाबदारी स्वीकारणाऱ्या यंत्रणा सुद्धा हे रहस्यहीन, मंत्रहीन, भलिहीन, श्रद्धाहीन, ''क्रिया (अंतरगातील) हीन'' असे 'उपनयनाचे कलेवर' एका पोषाखी बहिर्गत दिमाखावर विसंबून आहेत व धन्यता मानत आहेत !!

**अग्नि व यज्ञ**

ह्या 'उपनयन' संस्कारातच नव्हे तर सगळ्या १६ संस्कारात व इतरत्रही एक अत्यंत समर्थ असा एक उपचार, सर्व संस्काराना आवश्यक असतो तो म्हणजे 'अग्नि' ची उपस्थिती व 'यज्ञ' हे आवश्यक अंग आहे.

काय आहेत ह्या दोन संकल्पना - अग्नि व यज्ञ ?

ह्या प्रश्नाचा फार सखोल विचार करावयाला लागेल. ह्या दोन्ही शब्दांचा वापर व आचार वा विनियोग सामान्य भाषेमध्ये, व व्यवहारात ज्या अर्थाने होतो, त्यापासून ह्या दोन्ही संकल्पना फार गहन, गूढ व भारतीय संस्कृतीच्या साधनसामुग्रीतील उच्च मानदंडाच्या आहेत.

शिवाय, मी ह्या संकल्पनांवर जे कांही अफाट वाङ्मय उपलब्ध आहे, त्या सर्वांचा परामर्ष बिलकूल घेणार नाही. It would result in distraction. कारण, त्यामुळे एक प्रकारचा भोंगळवाद येईल व मनाचा गोंधळ व चित्र विभ्रमच पैदा होईल.

उलट, त्या संकल्पनेचा खरा अर्थ जो संस्कृतीच्या खऱ्या गुणवत्तेचा आधार आहे, त्या अर्थावरच आपले लक्ष खेचणार आहे.

### निश्वसित ज्ञान अपौरुषेय

भारतीय संस्कृतिचा मुख्य आधार हा वेद आहे. वेद हे 'इश्वर निश्वसित' ज्ञान आहे. म्हणजे एका अर्थाने ह्या संबंध विश्वाच्या निर्मीति व व्यवहाराच्या मुळाशी, उगमाशी जे ज्ञान निगडीत आहे ते, 'वेद संहिता' (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद) सांगण्याचा अद्वितीय प्रयत्न करत आहेत. त्या ज्ञानाची पातळी इतकी उंच व वेगळ्या स्तरावर-पातळीवर आहे की सध्याच्या मानव समाजातील प्रगल्भ व लोकमान्य विद्वानांना सुद्धा पूर्ण अर्थाने प्राप्त होईल, याविषयी शंका आहे. एका विशिष्ट 'ज्ञानपद्धतीतूनच' हा अर्थ प्राप्त होऊ शकतो. तो योग, समाधी व असंप्रज्ञात समाधिच्या स्थितीतच प्राप्त होऊ शकतो. वैदिक ज्ञानपद्धतीत (Vedic Epistemology) त्याला अलौकिक, अवस्थालयातील, गुणत्रयातीत, देहत्रयातीत वगैरे असे संदर्भ आहेत.

वेदांचे अर्थ लावताना काही 'उदार मतवादी विद्वान' असे म्हणतील की अधिभौतिक, अधिदैविक वा आध्यात्मिक, कुठल्याही पद्धतीने अर्थ लावण्यास हरकत नसावी. पण 'यज्ञ क्रिया' न त्यांतील 'अग्नि' ची भूमिका याचा जर 'आध्यात्मिक अर्थ' लावला नाही तर एक गहन चूक घडेल.

### तीन श्रेणींचे अर्थ

ह्या तीन पद्धति एका चढत्या भाजणीने बांधल्या आहेत. ह्याचा गुळमूळीत अर्थ करणे म्हणजे, हे तिन्ही अर्थ, एकाच श्रेणीचे किंवा गुणवत्तेचे असा नव्हे, तर ह्या भौतिक, दैविक व शेवटी आध्यात्मिक अर्थ ह्या 'चढत्या श्रेणीने' प्राप्त होणे आवश्यक आहे.

'भौतिक मर्त्य मानवी जीवन' हा ह्या चैतन्यशक्तिचा शेवटचा टप्पा नव्हे, तर एक मध्यंतरीचा आहे. जड, निर्जीव वनस्पती जीवन, प्राणीजीवन व आता मानवी जीवन, ह्या चढत्या क्रमाने ही वाटचाल झाली. पुढे मार्गक्रमण आहे, त्यांत कॉंशसनेसची उंची व पातळी 'Divine' दैवी पातळीकडे वाटचाल जावयाची आहे.

ह्या सर्व मार्गक्रमणेंत मुख्य प्रश्न आहे, तो हा कीं ही कॉंशसनेसची पातळी वाढवावयाची कशी? भौतिक शिक्षणपद्धतीमध्ये हे सामर्थ्य नाही, ही उघड गोष्ट आहे. प्रचलित 'धर्माची' (Religion) पातळी ही विकृत व आंधळी झाली आहे - तिची 'दिशा' गोंधळलेली आहे. उद्दिष्टे स्पष्ट नाहीत, नैतिक नाहीत, सात्विक नाहीत आणि समर्थ पण नाहीत. ह्यावर जास्त भाष्य नको, कारण हा संकुचित अभिनिवेशाचा वादाचा मुद्दा ठरण्याचा दाट संभव आहे.

### Structure of The Universe Configuration

मग ह्या गोंधळाचे कारण हे आहे कीं हे विश्व कसे निर्माण झाले व त्याची रचना कशी झाली व त्यातील कार्यभार कोणत्या तत्त्वांवर चालतो, याबद्दल माहिती असणे, आवश्यक आहे. शिवाय ते नुसते 'गद्य, शुष्क पांडित्य' ज्ञान असून उपयोगाचे नाही, तर एका पक्क्या विनवासाचे, श्रद्धेचे व अनुभूतीचे अंग बनावयाला हवे. शिवाय, हे काम पिढ्यान पिढ्या नवनवीन जन्माला येणाऱ्या मानवी जीवनाला तरी निदान जिवंत स्थितीत (Live Knowledge) ह्या स्वरुपांत प्राप्त होणे आवश्यक आहे.

### आध्यात्मिक यज्ञ क्रिया

ह्या सगळ्या गंभीर प्रश्नांचे उत्तर भारतीय संस्कृतीने संभाळले आहे, ते म्हणजे 'यज्ञ संस्कृति व यज्ञक्रिया', मात्र यावर कुणाचा विश्वास बसणेच कठीण आहे, इतका गोंधळ, गैरसमज व प्रतिकूल मत आज समाजात रुढ आहे.

ज्या व्यक्तींना व समाजाला ह्या यज्ञ संकल्पनेबद्दल आदर आहे, त्यांना स्वत:ला ह्या संकल्पनेचा मूळ उद्देश व

भविष्यातील उपयोग याचे ज्ञान नाही. ते करीत असलेले 'यज्ञ' हे शुष्क, ''क्रिया हीन'', ''फलहीन'' व दिखाऊ आहेत. या यज्ञांना विकृत विनीयोगासाठी वापरण्यात येत आहे, उदाहरणार्थ 'इलेक्शन जिंकण्यासाठी यज्ञ' वगैरे.

**Symbolism**

मग मुख्य मुद्याकडे वळू या. 'यज्ञ' ही संकल्पना म्हणजे एका 'प्रतिकात्मक क्रियेतून' मानवी कॉशसनेसमध्ये मनाच्या, अंत:करणाच्या, योगाच्या, श्रद्धेच्या व मुख्यत: अग्निच्या मदतीने कांही आंतरिक गूढ क्रिया, घडवून आणावयाच्या युक्तीचे 'साधन' आहे.

ही युक्ती कां वापरावयाला लागते ? त्याचे मुख्य कारण जन्मत: सर्व सामान्य माणूस किंवा भौतिकी वैज्ञानिकही ह्या दृश्य जगालाच 'अंतिम सत्य' मानण्याची मोठी चूक करतो, कारण खरे अतींद्रिय जग बघण्याची त्याची व त्याच्या साधनांची क्षमता नसते - व नाही. पण खरोखर त्याचीच नितांत गरज आहे. कां ? ''देवों और देवियों के स्वरुप के आध्यात्मिक गूढार्थ का ज्ञान वेद मन्दिर के गर्भ-गृह में प्रवेश के लिये अनिवार्य कुंजी है।''


दिशाच्या मागील अंकात, मी अगोदर अरविंदाचे भाष्य लिहीले होते. त्यातील मुख्य मुद्दा परत सांगतो की, वेद हे जर ह्या वैश्विक ज्ञानाची किल्ली असेल, तर त्यातील प्राथमिक अडचण म्हणजे ही की हे त्यांचे 'श्रुतिरुप' आहे. ही वेदभाषा - जरी लौकिकार्थाने किंवा व्याकरण शास्त्राप्रमाणे बुद्धीच्या आकलनात येत असली तरी ह्याचा फारसा उपयोग होणार नाही. ही 'अपौरुषेय' तर आहेच, पण ती एक लयबद्ध, वाणी, वाक् आहे - ती एका गूढ वैश्विक स्पंदनाची भाषा आहे - ती मंत्रात्मक आहे. ती भाषा स्वीकारण्यासाठी विशेष पात्रता कमवावयाला लागते. हा 'रिसीव्हिंग एजंट' एक तऱ्हेचा 'ब्राह्मण' म्हणजे वेदज्ञान जाणू इच्छिणारा व 'ब्रह्मचारी' आचार विचाराचा हवा म्हणजे एक "Pure biological Human life as an efficient instrument of Reception and Transmission' असा हवा.

असा 'मानव' वा 'साधक', मानवी समाजाचा प्रतिनिधी निर्माण करण्याची जबाबदारी 'भारतीय, हिंदू समाजाने स्वीकारली होती.'' गुरुकुले व समाज त्यासाठीच हे १६ संस्कार (गर्भादान ते अंत्यष्टि) करण्याचा आग्रह ते समाजाला करीत होते.


तेव्हा पुन्हा एकदा ह्या 'यज्ञ' संकल्पनेकडे वळू या. महायोगी अरविंद म्हणतात. "The whole process of the universe is in its very nature a 'sacrifice', डॉ. काशीकर म्हणतात : "One cannot unlock the Secrets of the Vedic Minds, unless the uses the key of knowledge of sacrificial rithals." ''यज्ञीय विधींची किल्ली वापरल्याशिवाय वैदिक ऋषींच्या मनातील गूढ गुणितांची कुलपे कुणी उघडू शकणार नाही. (१९६८ साली वाराणशीला झालेल्या अखिल भारतीय प्राच्य विद्या परिषद २४ वे अधिवेशन, अध्यक्षीय भाषण डॉ. काशीकर.)

बौधायन श्रौतसूत्राने (२४.१) यज्ञविधीच्या ज्ञानाच्या साधनांचा उहापोह करताना म्हणाले आहे - ''यज्ञविधीचे ज्ञान, पाच प्रकारांनी करुन घ्यावे - छंदसा म्हणजे मंत्राने, ब्राह्मणाने, प्रत्ययेन म्हणजे ऋत्विजांच्या निर्देशनाने, न्यायेन म्हणजे समान संदर्भाने आणि संस्थावशेन म्हणजे यज्ञपूर्तीसाठी विहित विकल्पांद्वारे'' - वेदार्थपद्धती - योग आणि यज्ञविधींचे स्थान - (निबंध डॉ. त्रि. ना. धर्माधिकारी - भाष्यांतर)

महेश योगी यांनी ऋचेमध्ये अंतर्भूत असलेल्या ज्ञानमार्गांचा अर्थ विशद करुन सांगितला आहे. "Transcenderfel unitied field of Life" (अलौकिक, इंद्रियातील वगैरे एकात्म क्षेत्र-जीवन) ह्या ज्ञानाला ते ''संहिता'' म्हणतात. ज्ञानाच्या साधकाला ते 'ऋषी' म्हणतात. आणि ज्ञान किंवा Object of Knowledge




चित्र नं. ३ Unified Field - Physics




चित्र नं. ४ Vedic Unified Field

ह्याला ''छंद'' म्हणतात. ह्यांचा परस्पर संबंध ('unified field' 2) ह्या चित्रांत पहावा. (Physics चित्र नं. ३, Vedic चित्र नं. ४) ही 'ज्ञानाची क्रिया' योगाच्या ध्यान, धारणा, समाधी व "Transcendental Meditation" ह्या पद्धतीने होते. समाधी ही एक आवश्यक अवस्था पण ती Static नसून Dynamic व कल्पनाशक्ति जागृत ठेवून, क्रियाशील ठेवून हवी. हा विलक्षण जगावेगळा प्रकार 'वेदिक सायन्स' का सांगते. केवळ 'ऋचा' च्या "Textual" गद्य ज्ञानाचे 'पूर्ण विश्लेषण' एखाद्या वैदिक पंडिताने केल्याने का होऊ नये ? त्याकरिता "Ritual" 'कर्मकांडी'-धार्मिक विधी-यज्ञ कां आवश्यक असावा?

ह्याचे कारण, हे वैश्विक 'ऋत ज्ञान' ज्या स्तरावर आहे - ज्या पातळीवर आहे - ज्या Plane म्हणजे Level of consiousness कॉंशसनेसची श्रेणीवर आहे, तिथपासून ते मर्त्य, असमर्थ, क्षीण व विकारी बुद्धीच्या व मानवी देहांत बद्ध असलेल्या 'चैतन्याला' प्राप्त होणे कठीण आहे. This is a difficult transmission हा ज्ञानव्यवहार व संक्रमण 'दुर्लभ' आहे.

काय आहे या भाष्याचा पुरावा ?

''ऋचो अक्षरे परमे व्योमन यस्मिन देवा अधि विश्वे निषेदुः ।
यस्तन वेद किमृचा करिष्यति य इत् तद् विदुस्त इमे समासते ॥

ऋग्वेद मं. १\अ.२२\सू. १६४\३९
ऋषी : दीर्घतमा
देवता : विश्वेदेवा
छन्द : - त्रिष्टुप, जगती, प्रभृति


पं. श्रीराम शर्मा (गायत्री परिवार) यांचे भाषांतर असे. ''ऋचाएँ उच्च स्थान को प्राप्त है । सब देवता उनपर आश्रय लिये हूए है । जो इस बात को नही जानता वह ऋचा से क्या लाभ उठायेगा ? जो इसे जानता है, वही प्रसन्न रहता है ।

महेश योगी यांचे भाषांतर : किंवा भाष्य : - "The verse of veda exist in the collapse of fullness in the transcendertal field, in which reside all the impulses of creative intelligence, the laws of Nature, responsible for the whole manifest universe. He whose awareness is not open to this field, what can the verses accomplish for him? Those who know this level of reality are established in evenness, in wholeness of Life !!


पुढे ते म्हणतात : - The holistic nature of intelligence emerges only when the knower is familiar with the - most holistic, universal level of life,- the unified field, the 'akshare' (ऋचो अक्षरे)

the unexpressed, the unmanifest basis of the manifest, phenomenal world."

एक मुद्दा पक्का ध्यानांत ठेवावयाला हवा. 'यज्ञाची क्रिया' ही प्रतिकात्मक Symbolic आहे. ही क्रिया 'भौतिक जातीची व त्यांतील सामुग्री, साधने ही देखील भौतिक आहेत. अग्नि, समिधा, पुरोडाश, वेदी, यजमान, ऋत्विज वगैरे वगैरे.




चित्र नं. १ (Normal)




चित्र नं. २ Yajna (Symbolism)
Spiritual Act (REAL)

पण, ह्या व्यक्त जगातील भौतिक प्रयोगावरुन आपल्याला अव्यक्त 'unmanifest' जगातील सूत्र, ऋत नियमांवर आधारुन, ह्या भौतिक जगातील स्वत:ला "आत्मोन्नती" करुन घ्यावयाची आहे. समाजाची पण साधावयाची आहे.

ही जी Process यंत्रणा आहे ती सुद्धा आगम, अनिर्वचनीय व अव्यक्त व व्यक्त जगांतील तत्त्वावर, नियमावर, नात्यांवर (Relatives) वर आधारित आहे. (चित्र नं. १, चित्र नं. २) पहा.

एवढेंच नव्हे तर ती ज्या साधकाला प्राप्त व्हावयाची आहे, त्याची ज्ञानसाधनेची साधने व यंत्रे ही फारच कमकुवत, दुर्बल, कल्पनाशक्ती, दृष्टीची (Perception) आहेत. त्यामुळे हा 'यज्ञक्रियेचा' समारंभ किंवा प्रयोग एक अलौकिक प्रयोग आहे व तो ह्या साधकाच्या मनावर एक नवीन Habit formation सवयी, विचार, श्रद्धा यांचा आकृतीबंध कोरणार आहे (Channelise and chisseling) त्याच्या सातत्याने साधकाच्या सामान्य मनाला नवनवीन सामर्थ्याची, कल्पनेची, रुपांची, चित्रांची शिडी चढावी लागणार आहे. त्या साधकाचे, यजमानाचे एका चढत्या श्रेणीने आध्यात्मिक उंच पातळीवर संक्रमण होणार आहे. हा एक विलक्षण, अलौकिक संस्कार आहे. यज्ञ ही त्या संस्कारक्रियेची सरळ, सुबोध (Direct and easy) अशी क्रिया नसून प्रतिकात्मक पद्धतीने केवळ साधकाच्या 'आंतरिक मानसिक, बौद्धिक, भावनिक, आध्यात्मिक (Spiritual) क्रियेमुळे साध्य होणार आहे. वैश्विक निर्मीतीच्या वेळी ह्या भौतिक विश्वाची ज्या अव्यक्त जगातून निर्मीती झाली. तो 'पुरुषयज्ञ' त्याचीच एक छोटी प्रतिकृती म्हणजे हा यज्ञ होय.

महायोगी अरविंद म्हणतात :- "Vedic Sacrifice, in all its aspects and details, is purely, Symbolic. It is pre-eminently esoteric and not exoteric, psychological and not ritualistic in its

conception. All the various parts of the vedic sacrifice here within us.

(ह्या सर्वांची वर्णने यजुर्वेदात मिळतात) अरविंदाच्या शब्दात "As the flame of divine will is kindled and waxes higher and higher with the growth of human aspiration for the divine, the performer of sacrifice also ascends higher and higher.

**पुरोहित ऋषी अव्यक्तातील जागृत अग्नि**

ह्या यज्ञक्रियेत 'अग्नि' चा कोणता कार्यभार किंवा क्षमता आहे ? हा 'अग्नि' भौतिक स्तरावरील 'Fire' नव्हे तर जे स्थित्यंतर, संक्रमण, संस्कार यजमानाच्या किंवा साधकांच्या Consciousness आल्यावर करावयाचे आहे त्याचा मुख्य 'एजंट'-पुरोहित आहे. वेदामध्ये काय मार्गदर्शन आहे ?

''अरण्योनिहितो जातवेदा गर्भइव सुधितो गर्भिणाषु। दिवे दिव ईड्यो जागृवद्भि र्हविष्मद्भिर्मनुष्येभिरग्नि॥

| | |
|---|---|
| भाष्य : | सलग अर्थ |
| ऋचा भाग | |
| गर्भ इव गर्भिणीषु | गर्भिणी स्त्रियों मे जैसे गर्भ |
| सु-धित : | उत्तम प्रकार धारण रहता है । वैसे ही |
| जातवेदा, जातानि वेद, | उत्पत्ति धर्मी पदार्थो का ज्ञान |
| जात प्रज्ञान: निरु | |
| अरण्यो: निहिता | प्रत्यक्ष और आत्प, ज्ञान मन्थन के इन दो साधनो मे छिपा है । |
| जागृवद्भि : | ज्ञान मे जाग्रतो के द्वारा |
| हविष्मद्भि: | ज्ञान के (क्षेत्र) |
| क्षेत्र | मे योगदान देने वाले |
| मनुष्येभि: | मननशील पुरुषों द्वारा |
| दिवे २ | प्रतिदिन, निरन्तर |
| अग्नि : | वह ज्ञान |
| ईड्य: | स्तुत्य हुआ है, उपासनीय हुआ है। |

ह्यावर केलेले विशेष भाष्य फारच महत्वाचे आहे. कर्मकाडी पुरोहितांनी, ब्राह्मणांनी लक्षात ठेवण्याच्या लायकीचे आहे.

डॉ. विष्णुकांत वर्मा पुढे म्हणतात :
नान्या: पन्था विद्यतेऽयनाय ।

''ऋचा का भावार्थ है कि ज्ञान के प्रति जिज्ञासु वृत्तीवाले उपासनारत मननशील को वेद के मंत्रो में निहित ज्ञान प्राप्त हुआ है अन्यों के लिए 'गर्भ' मे लिये शिशु की तरह अज्ञात है ।''

डॉ. विष्णुकांत वर्मा यांना म्हणावयाचे आहे की आध्यात्मिक 'क्रियाहीन' अशी कर्मकांडी यज्ञाची भूमिका नाही. अरणीमधल्या घर्षणानी जरी भौतिक अग्नि प्रगट होत असला, तरी या ऋग्वेदातील अग्निसुक्तातील वैश्विक अग्नि जर त्या भूतलावर प्रगट करावयाचा असेल तर ती कृती ज्ञानी, योगी, जबर कल्पनाशक्ती चे काम आहे. जे भौतिक अग्नि प्रगटीकरणासाठी कष्ट, यत्न करावे लागतात. त्याच तीव्रतेची 'तपस्या' ही यजमानाला (साधकाला) त्याच्या अंतरंगात करावी लागते. ह्यासाठी 'अधिकार' व 'साधना तपस्या' आवश्यक आहे.

**सत्याश्रित यज्ञक्रिया**

हा यज्ञ म्हणजे काही 'व्यापार' नव्हे ! डॉ. विष्णुकांत वर्मा MSC., LLB, Ph. D (Lucknow univ.) Ex. Head of the dept. of Mathematics and Principal Govt. Engineering College. Bilaspur (M.P.)

हे आपल्या 'अध्यात्म विद्या भाग १' Rig vedic metaphysical knowledge Part I.

ह्या ग्रंथात वरील ऋचेवर भाष्य करताना म्हणतात: - ''ऋचा मे जागृवत शब्द ज्ञान मे जाग्रत के लिए आया है, अरणियोसे मंथन के लिए यह विशेषण सर्वथा आयुक्त है. उसके लिए यह विशेषण कतई आवश्यक नही है। अरणियों से 'अग्नि' कोई भी उत्पन्न कर सकता है, उसके लिए 'हनिषमत' होना आवश्यक नही है। हनिषमत का अर्थ है - आहुति देनेवाला यहाँ इसका अर्थ है ज्ञान संबंधी अविष्कार करने वाले लेखक, वैज्ञानिक, दार्शनिक आदि। इस प्रकार जागृत, हनिष्मत, ईडय: शब्द क्रमश: ज्ञान, कर्म और उपासना के द्योतक है। इनका अरणियों द्वारा अग्नि उत्पत्ति किंचित मात्र भी संबंध नही है।

'यज्ञ हा Commercial Trade भौतिक व्यापारी तत्त्वावरचा नव्हे, की जो पैसे फेकल्यावर 'पूर्ण' होतो. ह्या व्यापारांत बँकेतील Credit Transfer योजना नाही. पुरोहित, गुरु हे मार्गदर्शन करतील, पण 'कृती' यजमानालाच करावी लागते. शिवाय यातील सर्व 'देवता' म्हणजे Spiritual Energies 'आध्यात्मिक शक्ति' ह्या अदृश्य किंवा अव्यक्तच आहेत. त्यांच्या 'अधिकारयुक्त आवाहनाने' आलेल्या देवताशक्ति सिद्ध मंत्रांद्वारे, यजमानाच्या चित्रावर, आत्म्यावर संस्कार होतात. हे मंत्र वैखरी नव्हते वर 'नादासंधानाच्या'तंत्रातील स्पंदनांची संवादी क्रिया आहे. हा सुसंवाद फक्त यजमानाच्या जाणीवेच्या Realisation अनुभूतीच्या स्तरावर साधला जातो.

थोडक्यात म्हणजे, आज जी 'यज्ञक्रिया' होते ते एक निष्प्राण, अर्थहीन क्रिया असून आपल्याला वैदिक शास्त्रावर, सत्यावर आधारलेल्या 'यज्ञकृती' मिळवण्यासाठी ''वैदिक सत्यमार्गाची'' पुर्नस्थापना, पुनरुज्जीवन करण्याची आवश्यकता आहे. ती कशी करावयाची, ह्याचे चित्र पुढल्या अंकातील लेखात मांडू या.

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट अग्यारी लेन, ठाणे - ४००६०१.
टे. नं. २५३६८४५०
E-mail : yrsane@eth.net Mbl : 9892046539

पृष्ठ क्र. ७ वरुन

**श्री समर्थ रामदास**

केला असता असे दिसून येते की हरिकथेनंतरच्या पुढील दोन गोष्टी राजकारण व सावधानता, थोडक्यात चातुर्य व सावधानता यांचा अतिशय निकटचा संबंध आहे. चातुर्याने राजकारण साधते, चातुर्याच्या पायावर राजकरणाची भव्य इमारत उठत असते. महाराष्ट्र मंदिराचा पाया हरिकथा निरुपण असेल तर मधली इमारत ही चातुर्याची व त्यावर विराजमान होणारे राजकारण म्हणजे हा मधला सांधा सावधानतेचा आहे.

समर्थांना आपल्या शिष्याकडून हीच अपेक्षा होती. महंताने आपल्या अमोघ व अचूक वाणीने ठायी ठायी जमलेल्या लोकांना हरिकथा निरुपणाची चटक लावावी, मग भोवती गोळा झालेल्या विशाल समुदायाला राजकरणाला उपयुक्त असलेले ज्ञान, देश काळ परिस्थितीचे भान ठेवून, महाराष्ट्रधर्माचे ज्ञान हळू हळू देण्यास सुरुवात करावी. लोकांच्या चालीने चाळून, त्यांच्याच बोलीने बोलून हळू हळू लोकांना शहाणे करावे. त्यांना युक्तीबुद्धीने भरावे. जागोजागी गुप्त मंडळ्या स्थापना कराव्या, भजन, महोत्सव द्वारे लोक राजकरणाला पात्र होतील असे करावे. महंते महंत करावे। युक्तिबुद्धिनेभरावे। जाणते करुन विखरावे। नानादेशी ११/१०/२५ समर्थांच्या वेळी सत्ता परकीय होती म्हणून या गोष्टी गुप्त रुपाने कराव्यात असे त्यानी सांगितले आहे. हे थोडक्यात चातुर्याचे व सावधपणाचे सार आहे.

(क्रमश:)

**- शं.वा.मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

**पुस्तक परिचय**

# गीतासागर

*गीतेविषयीच्या ग्रंथाचा परिचय गीतेच्या अभ्यासक श्रीमती आशा भिडे करुन देत असतात. या परिचय मालिकेतील पुढील परिचय - संपादक*

विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर

प्रकाशक - आदित्य प्रतिष्ठान. पुणे

पृष्ठे - ११२ मूल्य - १३०० रु.

'गीतासागर' हा ग्रंथराज आहे. आकाराने ज्ञानेश्वरी पेक्षाही मोठा. ज्याला 'गीतेचा' सखोल अभ्यास करायचा आहे. (अगदी वेद, पुराणे, उपनिषदे ब्रह्मसूत्रे, श्रुती स्मृती वगैरे सह) त्याला पुस्तक अत्यंत उपयुक्त असेच आहे.

विद्यमान लेखक हे भक्तीकोशाचे प्रमुख संपादक आहेत. त्यांच्या जन्महीं गीताजयन्तीचाच आहे हा केवढा दुग्धशर्करा योग ! या प्रस्तुत पुस्तकाची प्रथमावृती १९९८ ला गीताजयन्तीला व दुसरी आवृतीही २००० साली गीताजयन्तीलाच निघाली आहे. लेखक उच्चविद्याविभूषित तर आहेच शिवाय त्यांचे ग्रंथ कर्तृत्त्वही मोठे आहे. त्यांना अनेक राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरष्ट्रीय पुरस्कारही मिळालेले आहेत. स्वामी विवेकानंदाच्या शैक्षणिक तत्त्वावर त्यांनी पी. एच्. डी. केलेले आहे. भारतीय संस्कृतीची जोपासना आणि लोकशिक्षण यासाठी त्यांनी आदित्य प्रतिष्ठानची स्थापना केली आहे. विश्वकोश वाङ्मयास महत्त्वाचे योगदान तसेच अत्यंत मधुर वाणीत विद्वताप्रचूर प्रवचने केली आहेत.

'गीतासागर' हा ज्ञान, आकार व वजन यामुळे सामान्यांना न पेलणारा ग्रंथराज आहे. मुखपृष्ठावर पानभर अर्जुन युद्धास तयार झालाय व श्रीकृष्ण सारस्थ करतोय असे भव्य आकर्षक रंगीत चित्र आहे. मलपृष्ठावर मोरपीसाच्या पार्श्वभूमीवर गीतेचे महात्म्य विषद केले आहे. ते असे.

''भगवद्गीता ही सर्व शास्त्रांचे शास्त्र आहे. कलांची कला आहे. सर्व तत्त्वज्ञानाचा मुकुटमणी आहे... वक्ता साक्षात् नारायण, श्रोता साक्षात नर, उपदेशाचा हेतू अवघ्या विश्वाचा उद्धार आणि अधिकारानुरुप मार्गदर्शन अशी गीतेची अपूर्वता आहे. 'सर्वधर्मान्परित्यज्य मायेकं शरणं व्रज'। ही गीतेची शक्ती होय.

मुखपृष्ठाच्या मागे लेखकाची ग्रंथसंपदा दिली आहे. तर मलपृष्ठामागे छायचित्रासह लेखकाचा अल्पपरिचय दिला आहे. पुस्तक उघडताच आतल्या पानावर फिकट निळसर रंगता शंख चक्रधारी श्रीकृष्णाचे मोहक चित्र आहे. शेवटी पण तेच चित्र आहे. 'गीता सुगीता कर्तव्या' हे लेखकाचे मनोगत आहे. यात प्रस्तुत ग्रंथाचे प्रयोजन व स्वरुप सांगितले आहे. गीता सागराप्रमाणे अथांग आणि आकाशाप्रमाणे व्यापक आहे. त्यासाठीच गीतेचे अंतरंग जाणून त्याचा प्रत्यक्षानुभंव घेण्याचा हा यत्न आहे. गीतेचे संस्कार आईमुळेच झाले असे ते म्हणतात. तिलाच पुस्तक अर्पण केले आहे. तिला संपूर्ण गीता मुखोद्गत होती. वडिलही संस्कृत विद्या व्यासंगी, उत्तम कीर्तनकार प्रस्तुत ग्रंथ हे त्या शुभसंस्कारांचेच फलित आहे असे ते म्हणतात.

या ग्रंथाची रचना कशी केली आहे. त्याबद्दल ते मनोगतात सांगतात. प्रस्थानत्रयीत गीतेचे स्थान कोणते, भगवंत कोणाला म्हणतात, अवतार म्हणजे काय, गीतेचा अनुबंध, चतुष्टय, षड्लिंग पाठक्रम आणि गीतेचा निर्मिती कोणत्या नाटयमय प्रसंगात झाली, त्याचा इतिहास या गोष्टी प्रस्तावनेत स्पष्ट केल्या आहेत. त्यानंतर क्रमशः १ ते १८ अध्याय आणि त्यातील ७०० श्लोक विवेचनासह स्पष्ट केले आहेत. अध्यायाच्या प्रारंभी पूर्वसूत्रात या अध्यायाची

पार्श्वभूमी आणि मागील अध्यायाशी असलेला अनुबंध दिलेला आहे. प्रत्येक श्लोकाचा पुढील व मागील श्लोकाशी असलेला अनुबंध (नातं) प्रत्येक श्लोकापूर्वी स्पष्ट केला आहे. त्यानंतर ठळक अक्षरात श्लोक त्यानंतर अन्वय म्हणजे मूळ संस्कृत श्लोकाचे गद्य रुपांतर नंतर श्लोकाचा अर्थ व नंतर श्लोकाचे विवरण केले आहे. म्हणजे अनुबंध, श्लोक, अन्वय, अर्थ व विवरण असा क्रम आहे. ग्रंथाच्या शेवटी विशेष परिशिष्टे दिली आहेत. ती अभ्यासकांना उपयुक्त आहेत. परिशिष्टांच्या शेवटी गीतेचा शब्दकोश दिला आहे. त्याचा गीतेचा अर्थ समजून घेतांना अभ्यासकांना त्याचा उपयोग होईल. संपूर्ण गीतेतील विशेष श्लोकांचे संकलन परिशिष्ट ११ मध्ये केले आहे.

मानवाला आत्मोन्नत करुन त्याला 'स्व' रुपाची ओळख करुन देणे हाच गीतेचा सात्त्विक हेतू आहे. देहात्मवादाच्या पराकोटीच्या ढोंगी तत्त्वज्ञानाने चंगळवाद सर्वत्र पसरवला आहे. त्यामुळे तरुण पिढी संस्काराला, शाश्वताला पारखी होऊन खोट्या मृगजळामागे धावत आहे. माणसाच्या रक्ताची चटक लागलेल्या वाघापेक्षाही असा माणूस महाभयंकर असतो,

हे सगळे पालटण्याचे सामर्थ्य गीतेत आहे, नव्हे गीतेतच आहे. पंचमहाभूतांचा उपयोग करुन मानवाने विज्ञानाला राबवले आहे नमवले आहे. गीता म्हणजे विज्ञान आहे. परमात्म्याने निर्माण केलेल्या अपरा प्रकृतीचे सामर्थ्य जर असे असीम असेल तर परमात्म्याचे किती असेल?

'पसायदानात' ज्ञानेश्वरांनी जो जे वांछिल तो ते लाहो म्हटले आहे. 'ज्याला जे हवे' ते देण्याचे अपूर्व सामर्थ्य गीतेत आहे. त्यासाठी १२ व्या अध्यायात सांगितलेले सात्त्विक ज्ञान, सात्त्विक कर्म, सात्त्विक कर्ता, सात्त्विक धृती, सात्त्विक बुद्धी, सात्त्विक सुख यांचे उदंड पीक या देशात उगवले, वाढले, पोसले पाहिजे. त्यासाठी १७ व्या अध्यायात सांगितलेला सात्त्विक आहार, सात्त्विक यज्ञ, सात्त्विक तप, सात्त्विक दान मानवाला विशेषेकरुन तरुणांना आचरता आले पाहिजे, कायिक, वाचिक मानसिक तप आपण केले पाहिजे. १६ व्या अध्यायातील दैवी संपत्ती धारण करुन असुरी संपत्तीचा त्याग करता आला पाहिजे. रज-तम टाकून सत्व गुण वाढवला पाहिजे.

आत्मबुद्धीसाठी देहबुद्धी टाकावी लागते. सद्गुणांसाठी दुर्गुण टाकावे लागतात. काही मिळवल्यासाठी काही टाकावे लागते. हे सगळे प्रयत्नपुर्वक जमू शकते. अशक्य काहीच नसते. फक्त त्यासाठी श्रद्धा, निष्ठा, चिकाटी, सातत्य, अभ्यास मात्र हवा असे भगवंताने अर्जुनाच्या निमित्ताने सर्वांनाच गीतेत हे सांगून टाकले आहे.

गीतेच्या बहिरंगानंतर थोडे अंतरंगात डोकावूया- 'गीताध्यानम' नंतर पहिल्या अध्यायाचे विवेचन चालू होते. प्रत्येक अध्यायाच्या सुरवातीला भगवंताचे चित्र व त्याखाली ॐ श्रीयस्मात्मने नम: लिहिले आहे. अध्याय एक- अजुनविषादयोग, श्लोकसंख्या - ४७, छंद अनुष्टुप् वक्ते- धृतराष्ट्र-(१श्लोक), संजय - (२३ श्लोक), अर्जुन - (२३ श्लोक) अध्यायाचे नाव - कौरव आणि पांडव महाभारतीय युद्धासाठी कुरुक्षेत्रावर समोरासमोर उभे टाकलेले असतांना आपल्याच स्वजनांना आपण कसे मारावे, असा कर्तव्याकर्तव्याचा प्रश्न अर्जुनाला पडला. त्यातून त्याला विषाद निर्माण झाला. विषाद म्हणजे खेद, दु:ख, उत्साहभंग, निराशा, ग्लानी, गळाठा इत्यादी त्यामुळे तो स्वधर्मापासून, स्वकर्तव्यापासून ढळला, पण अर्जुनाच्या विषादालाही मुमुक्षुत्वाची, आत्मोद्धाराच्या तळमळीची उंची होती. त्याचा विषाद प्रेयसाकडे नव्हे तर श्रेयसाकडे, झेपावणारा होता. म्हणून तो 'योग' ठरला. म्हणून या अध्यायाचे नाव 'अर्जुनविषादयोग' असे आहे. अर्जुनाविषाद योग' म्हणजे गीतेची प्रस्तावनाच!

**अनुबंध** - दुर्योधन - शकुनि-कर्ण- दु:शासन यांच्या छळ कपटाला बळी पडलेले पांडव वनवासाला गेले, बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञानास अशी तेरा वर्षे त्यांनी कष्टांत काढली, पण प्रतिज्ञा पाळली.

वनवास व अज्ञातवास संपल्यावर पांडवांना त्यांचे राज्य परतं मिळेल असे अभिवचन दिलेले असूनही कौरवांनी

ते पाळले नाही. उलट सुईच्या टोकावर मावेल एवढी कणभर जमिनही पांडवांना आपण देणार नाही. असे उद्दाम उद्‌गार कृष्ण शिष्टाईच्यावेळी दुर्योधनाने काढले. त्यामुळे भारतीय युद्ध अटळ ठरले युद्धाच्या १० व्या दिवशी भीष्माचार्य मारले गेले. परिणामत: धृतराष्ट्राला अत्यंत दु:ख झाले. युद्धाची समग्र वार्ता आपल्याला कळावी म्हणून त्याने संजयाला सांगितले. महाभारताचे ५ वे पर्व भीष्मपर्व असून त्यातील ३रे उपपर्व भगवद्गीतेचे आहे. या उपपर्वात २५ ते ४२ अध्यायात भगवद्गीता आली आहे. युद्धाचे पहिले दहा दिवस गेल्यावर धृतराष्ट्र-संजय संवाद आला आहे. त्यावेळेला धृतराष्ट्राने पहिला प्रश्न केला -

**धृतराष्ट्र उवाच**

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समनेता युयुत्सव:।

मामका: पाण्डवाश्चैव किम कुर्वत संजय ॥ गीता १.१

अन्वय - 'संजय! धर्म क्षेत्रे कुरुक्षेत्रे समनेता: युयुत्सव:

मामका: च एव पाण्डवा: किम् कुर्वत?

अर्थ- हे संजया ! धर्मभूमी (रुप) कुरुक्षेत्रात एकत्रित झालेल्या व युद्धाची इच्छा करणाऱ्या माझ्या आणि पांडुच्या पुत्रांनी काय केले?

यानंतर विस्तृत असे श्लोकाचे विवरण आले आहे त्यात असे म्हटले आहे की भगवद्गीतेचा प्रारंभ धर्माने व सांगता सुद्धा धर्मानेच ज्या धर्माचे सार श्री, विजय, विभूती आणि अचल नीतीत असते त्या धर्माच्या गाभ्याचा गौरव करुनच झालेली आहे. असे ते धर्माचे मोठे विलक्षण वर्तुळ श्रीकृष्णांनी आखले आहे. यात कुरुक्षेत्राची थोरवी देखील सविस्तर सांगितली आहे. ती अभ्यासकांनी मूळातूनच वाचावी.

प्रत्येक श्लोकावर असे विस्तृत सविस्तर विवेचन केलेले आहे. त्याची झलक पाहिल्या श्लोकाच्या विवेचनातून वाचकांना दाखवली आहे. एकूण सर्व अध्यायांचे विवेचन १०५६ पानात संपते २ रा, ४था, ६वा, १०वा, ११वा, व १८ वा या अध्यायांचे विवेचन विस्तृत प्रमाणात केलेले आहे. शेवटी एकूण १७ परिशिष्टे आहेत. ती गीतेच्या अभ्यासकांना अत्यंत उपयोगी ठरतील अशीच आहेत. गीतामहात्म्यम् व गीतेच्या आरतीनंतर परिशिष्टे आहेत.

परिशिष्ठ १ - गीता अध्याय संगती - अध्याय क्रमांक व नाव अध्याय एक - अर्जुनविषादयोग, छंद-अनुष्टुप, श्लोक-४७,

| | |
|---|---|
| वक्ते - धृतराष्ट्र १ श्लोक | खरे असे आहे. |
| संजय २५ श्लोक | संजयाचे २४ श्लोक |
| अर्जुन २१ श्लोक | अर्जुनाचे २१ श्लोक |

गीतेच्या सुरवातीला पाहिल्या अध्यायात

| | |
|---|---|
| वक्ते- धृतराष्ट्र १ | असे चुकून दिले गेले आहे. |
| संजय - २३ | |
| अर्जुन - २३ | |

२१ व्या श्लोक संजय व अर्जुनाच्या मिळून आहे. (एक एक ओळ दोघात विभागली गेली आहे. हे रचनाकाराचे कसब, कौशल्य आहे.)

असा सर्व अध्यायांचा तक्ता दिला आहे. अध्याय २, ८, ९, ११, १५ यात त्रिष्टुप या छंदाचे काही श्लोक आहेत. संपूर्ण गीतेत अनुष्टुप् - ६४५, त्रिष्टुप - ५५ असे ७०० श्लोक आहेत.

**परिशिष्ट २** - यात गीतेत आलेली भगवंताची नावे दिली आहेत उदा. अच्युत काधीही न ढळणारा, मूळ स्थानापासून च्युत न होणारा १.२१, ११.४२, १८.७३=३

**अनंत** - अंत रहित असा परमात्मा ११.३७ = १,

अशी श्रीकृष्णाची चाळीस नावे आली आहेत.

**परिशिष्ट ३** - गीतेत आलेली अर्जुनाची नावे - उदा. अर्जुन - विशुद्धचित्त = ४४ वेळा, कौन्तेय - २४ वेळा, धनंजय - ११ पार्थ - ४० वेळा कोणत्या अध्यायात हे

नाव आलेय तो अध्याय व श्लोक नंबर दिलेला आहे. अर्जुनाची २३ नावे गीतेत आली आहेत.

**परिशिष्ट ४** - गीतेत आलेल्या विभूती एकूण १९४ अध्याय व श्लोक नंबर दिले आहेत.

**परिशिष्ट ५** -स्थितप्रज्ञाची लक्षणे एकूण ३० सांगितली आहेत (अध्याय व श्लोक नंबर दिले आहेत) उदा. स्थितधी ज्याची बुद्धी स्थिर झालेली असते २.५६

**परिशिष्ट ६** - कर्मयोग्यची लक्षणे - २२ (अध्याय व श्लोक, नंबर सह)

**परिशिष्ट ७** - योगारुढाची लक्षणे १२ (अध्याय व श्लोक, नंबर सह)

**परिशिष्ट ८** - भक्तोत्तमाची लक्षणे - ३९ (अध्याय व श्लोक, नंबर सह)

**परिशिष्ट ९** - ज्ञानी पुरुषाची लक्षणे - १८ (अध्याय व श्लोक, नंबर सह)

**परिशिष्ट १०** - गुणातीताची लक्षणे - ९ (अध्याय व श्लोक, नंबर सह)

**परिशिष्ट ११** - गीतेतील सर्वोत्तम श्लोक अर्थासह दिला आहे.

उदा. अध्याय २ रा २०, २२, २३, ४७, ४८ (श्लोक नंबर)

अध्याय ३ रा २०, २१

अध्याय ४ था ७, ८, ९ याप्रमाणे १८ अध्यायातील सर्वोत्तम श्लोक दिले आहेत.

**परिशिष्ट १२** - आधार ग्रंथ व संदर्भ सूची

**परिशिष्ट १३** - गीतेतील अवघड शब्दकोश त्यांचे अर्थसह अध्याय व श्लोक क्रमांकासह दिले आहेत.

उदा. अकर्तास - अकर्ता ४.१३, अक्लेद्य न भिजवला जाणारा २.२४ असे अ आ इ ई पासून संपूर्ण बाराखडीत येणारे शब्द दिले आहेत त्यामुळे गीतेतील सर्व अवघड शब्दांचा अर्थ समजू शकेल

**परिशिष्ट १४** - गीतेतील बारा यज्ञांची श्लोक व अर्थासह नावे दिली आहेत.

**परिशिष्ट १५** - गीतेतील अष्टांग योग यम, नियम, आसन, प्राणायाम प्रत्याहार, धारण, ध्यान, समाधी.

**परिशिष्ट १६** - गीतेतील नवविधाभक्ती

श्रवणं कीर्तन विष्णोः स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेनम् ॥

**पारिशिष्ट १७** - श्रीगीताश्लोकवर्णानुक्रमणिका

'गीता' ही स्त्रिलिंगी संज्ञा आहे. त्यामुळे भगवद्गीता ही अमृताचा वर्षाव करणारी माता आहे आणि गीता ही सर्वशास्त्रसमयी गंगा आहे. म्हणूनच विनोबाजींनी तिला माऊली म्हटले आहे.

गीताई माऊली माझी तिचा मी बाळ नेणता।

पडता रडता घेई उचलूनि कडेवरी ॥

गीतेत प्रतिपादन केलेले अध्यात्म ज्ञान हे निःसंशय उपनिषदातील आहे. कारण गीता म्हणजे उपनिषदांचे सार! या दोन्हीमधे काही साम्यस्थळे आहेत. काही उदाहरणे इथे दिली आहेत.

**गीता उपनिषदे**

२.२९ क.उ २.७

२.२० क. उ. २.१९ अशी आणखीही उदाहरणे दिली आहेत. याशिवाय गीतेतील २.१६, ८.६, ९.२१, १३.१७, २.१४ इ. अनेक विचार छांदोग्य व बृहदारण्यक या उप-निषदातूनच घेतलेले आहेत. वरील संदर्भातील उपनिषदांचे काही श्लोक तर गीतेत जसेच्या तसे आले आहेत. तथापि गीतेचे स्वतःचे असे काही योगदान विशेष करुन आहे. उदा. त्रिगुणात्मक प्रकृतीचा तपशील गीतेत आहे. जे वेदध्ययनाने, यज्ञनि, तदाने पाहता येत नाही ते केवळ अनन्य अशा ज्ञानेश्वर भक्तीने ते पाहण्यास मिळते.

पृष्ठ क्र. २१ वर

चित्रपालवी

# प्रत्येकानं हे वाचायलाच हवं

*'कला शिक्षिकेची कलेकडे पाहण्याची दृष्टी व जाण आपली कला विषयक जाणीव समृद्ध करणारी आहेत. त्या दृष्टीने सुरु असणाऱ्या लेखमालेतील पुढील लेख. - संपादक*

अश्विनी, एक आत्मविश्वासू, हुशार मुलगी इयत्ता पाचवीपर्यंत ती मुक्तहस्त चित्र काढणं, रंगवणं यात गुंगून जात असे. पण पुढे पुढे मात्र विज्ञानातील आकृत्या काढताना उदा. हृदयाची रचना, फुलपाखराच्या अवस्था, बीजे अंकुरणे यांसारख्यामध्ये ती कमी पडू लागली. तिच्या आकृत्या खूपच लहान येत असत. वास्तविक तिचं निरीक्षण चांगल होतं पण या व अशा आकृत्या काढताना ती आपला आत्मविश्वास गमावून बसत असे. परिणामी तिच्या गुणांचा आलेख खाली घसरु लागला. त्यामुळे तिला नैराश्य आल्यासारखं झालं. तिच्या लहान आकृत्या मोठ्या करण्याच्या कामी किंवा मोठ्या काढण्यासाठी तिच्या शिक्षकांनी तिच्यात असलेल्या चित्रकलेला प्रोत्साहन देऊन पाहिलं, काही मदत करु पाहिली पण ती मात्र स्वत:ला दोषी समजत होती.

खरं तर हे अनेकांच्या बाबतीत घडतं. लहानपणी मुक्त हस्तानं आविष्कार करणारे हात मोठेपणी वास्तववादी चित्रण करताना थरथरतात. यासाठी मला वाटतं **लहानपणासूनच पालकांनी आपल्या पाल्यांच्या चित्रकलेकडे योग्य लक्ष द्यावं.** एखाद्या कलाकाराला त्याच्या चित्राबद्दल विचारले की, तू हे कसं काय काढू शकलास? तर तो कदाचित उत्तर देईल, 'मला वाटलं, म्हणून किंवा ही एक देणगी आहे. म्हणून.' आपणही त्याच्यात असलेल्या या देणगीला त्याच्या कलेला मनोमन नमस्कार करु. खरं पाहता आपण सर्वच जण चित्र काढू शकतो पण सगळेच तसा विचार करत नाहीत.

कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीतील कला विभागातील एक प्राध्यापिक डॉ. बेट्टी एडवर्ड यांचं Drawing on the right side of the brain हे पुस्तक वाचनात आलं. त्यांनी मानवी मेंदूवर काही संशोधन करुन हे पुस्तक लिहिलं आहे, यात त्या म्हणतात, Drawing is a global (or whole) skill requiring only limited set of basic components. या दृष्टीनं त्यांनी या पुस्तकात काही मूलभूत अभ्याक्रम दिले आहेत. ज्यामुळे माणसातील सर्जनशीलतेला, निर्मिती प्रक्रियेला प्रोत्साहन मिळेल.



डॉ. एडवर्ड यांच्या मते चित्र काढणं ही नैसर्गिक गोष्ट आहे. कौशल्य म्हणूनही ती प्राप्त करून घेता येते. जसे सायकल चालवणं, पोहणं हे अनुभवानं शिकता येतं तसेच चित्रकलेचंही आहे. एकदा का या गोष्टी तुम्ही शिकलात की आयुष्यभर त्या तुम्ही विसरू शकणार नाही, पण त्यासाठी सराव मात्र हवा.

डॉ. एडवर्ड यांनी या पुस्तकात काही धडे दिले आहेत. त्यातून मेंदूत कुंठित (trapped) झालेली निर्मितीक्षमता शिथिल होऊन आपण निर्मितीक्षम होतो. Learning to drawn is learning to see. एखाद्या वस्तुकडे बघण्याची तुमची दृष्टी सुधारली की तीच वस्तू आपल्याला वेगळी भासते असं त्या म्हणतात आणि हे खरंही आहे. त्या पुढे असंही म्हणतात. Drawing will the

tap abilities of the right (उजवी) side of your brain the side that is right (योग्य) for drawing. By learning to draw you will learn to see अनेक कलाकाराचं म्हणणं असं की चित्रकलेतून ताणतणावापासून मुक्ती मिळते.

छोटे उदाहरण घ्या. एखाद्या वस्तूचं निरीक्षण करताना तिचा आकार, आजूबाजूची जागा, पार्श्वभूमी, त्या वस्तूवरील छायाप्रकाश या गोष्टी लक्षात घेतल्या की त्या वस्तूकडे बघण्याची दृष्टी बदलेल. एखादं फळ खाताना त्याकडे आपण खाण्यायोग्य वस्तू म्हणून पाहतो पण त्याच फळाचं चित्र काढताना मात्र आपली दृष्टी बदललेली असते. याबद्दलचं त्यांच विश्लेषण पटण्यासारखं आहे.

डॉ. एडवर्ड यांचा ठाम विश्वास आहे की, पालक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या चित्र काढण्याला वाव दिला, प्रोत्साहना दिलं तर ती वाचायला लवकर शिकतील, स्वत:ला अभिव्यक्त करायला शिकतील, चित्रवाचनामुळे त्यांची भाषाही सुधारेल.

या पुस्तकात त्यांनी चित्रकलेबद्दलचे काही धडे दिले आहेत. प्रयोग दिले आहेत. ते त्या गेली काही वर्षे वेगवेगळ्या वयोगटातल्या वेगवेगळ्या व्यवसायातील विद्यार्थ्यांवर करीत आहेत. आपल्या व मुलांच्या समस्या, अडचणी सोडवण्यासाठी ड्रॉइंग कसं उपयोगी आहे हे पटवून देताना त्या म्हणतात. A Drawing can let you see how you feel. Putting that another way the right brain by means of drawing can show the left brain what the trouble is. The left brain in turn can use its own powerful skills, language and logical thought to solve the problem.

त्याच्या मोलाचा सल्ला असा की दिवसभरात कुठलंही चित्र काढा, कसंही येऊ दे चित्रावर तारीख व नंबर टाकायला विसरू नका कारण कालांतरान, अनुभवानं तुमचीच प्रगती तुम्हाला समजेल. मग लागा कामाला, घ्या कागद आणि पेन्सिल व काढा भरपूर चित्रं. हो पण हे पुस्तकही शक्य तर वाचा:

**Drawing on the right side of the brain**

Dr. Betty Edward. Harper Collins Publishers, 77-85 Fulham Palace Hoadm, Hammersmith, London W68JB

**मंजिरी दांडेकर**
मधु-मिलिंद बिल्डिंग, घंटाळी रोड
नौपाडा, ठाणे ४०० ६०२
दूरध्वनी : २५४१४५३९

पृष्ठ क्र. १९ वरुन

**गीतासागर**

हा गीतेचा सिद्धान्त अलौकिक आहे. उपनिषदांचा मार्ग गीतेने अनुसरला, पण त्यात भर घालून अधिक संपन्नही केला. गीतेची जगाला सर्वोत्तम देणगी म्हणजेच निष्काम कर्मयोग.

वर्ण, आश्रय, ज्ञानी वैश्य शूद्र, स्त्री, पुरुष अशी समाज व्यवस्था तशीच ठेवूनही उपनिषदातील ब्रह्मविद्या आबाल - वृद्ध, स्त्री, वैश्य, शुद्र सर्वांना सुलभ व सुकर करुन देण्याचे गीतेतील भक्तियोगाचे सामर्थ्य व समता सर्वार्थाने अपूर्व आहे.

'गीतासागर' हा ग्रंथ ज्ञानाचाही सागर आहे. अनेक वेद पुराणे उपनिषदातील तपशील, बारकावे, उपयुक्त माहिती या दृष्टीने हा ग्रंथ परिपूर्ण झाला आहे. अभ्यासकाने यात खोल बुडी मारुन हवी तेवढी ज्ञान रत्ने ओंजळीतून बाहेर काढावीत.

'गीतासागर' हा ग्रंथ ज्ञानेश्वरी अथवा 'गीतारहस्य' याप्रमाणे गीतेवरील स्वतंत्र टीका असलेला आहे.

**आशा भिडे**
- बी/९, विजय अपार्टमेंट,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प) ४००६०२.

# वेध माहितीच्या उत्क्रांतीचा व विनियोगाचा

ग्रंथालय शास्त्र निष्णात परीक्षेचा एक भाग म्हणून निबंध लिहिण्याची यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची अट आहे. वाशी येथील 'कर्मवीर भाऊराव पाटील' महाविद्यालयातील केंद्रातील विद्यार्थीनी श्रीमती स्वप्ना वर्तक यांनी अभ्यास शिबीरासाठी लिहिलेला शोधनिबंध येथे देत आहोत. 'दिशा'त शोधनिबंध आल्याने त्यांना प्रोत्साहन व प्रेरणा मिळणे हा हेतू आहे. 'दिशा'चे कार्यकारी संपादक प्रा. मोहन पाठक हे त्यांचे मार्गदर्शक होते. (२००५-२००६ या वर्षात) - संपादक

**प्रास्ताविक :**

**१.१ समाज्याच्या उत्क्रांतीचे टप्पे :**

पूर्वी मानव निसर्गाच्या प्रेरणेने निसर्गाच्या सान्निध्यात रहात होता. जे खावे वाटेल ते तो खात होता. त्यावेळी तो शरीराचे संरक्षण करण्यासाठी काहीही वापरत नव्हता. इतर प्राण्यांप्रमाणेच रहात होता.

काही काळानंतर अन्न खाल्ल्यावर आपल्याला बरे वाटते हे त्याला जाणवू लागले. त्यामुळे तो अन्न मिळविण्याचा प्रयत्न करु लागला. ते अन्न म्हणजे फळे, प्राण्यांचे मांस, तृणधान्य. मानव हा इतर प्राण्यांपेक्षा बुध्दिशाली प्राणी असल्याने तो इतर प्राण्यांपासून संरक्षणाखातर समूहाने राहू लागला. हे समूह निर्माण झाल्यावर मिळवलेले अन्न तो वाटून खाऊ लागला. हे अन्न खात असताना काही धान्य खाली पडले. त्या धान्यावर पावसाचे पाणी पडले. व त्या पासून धान्याची वनस्पती तयार झाली त्या वनस्पतीला धान्य आले. हे त्याने पाहिल्यावर त्याला वनस्पतीपासून मिळणारे अन्न मिळविण्यासाठी त्या वनस्पतीची पुन्हा लागवड केली. आपण धान्य परत परत मिळवू शकतो. याची जाणीव त्याला झाली. त्या जाणीवेमुळे त्याने धान्य जमिनीत पेरुन पाणी घातले व त्याची जोपासना केली असता आपल्याला मोठ्या प्रमाणात धान्य मिळते. हे त्याने शोधले. मग त्याने वाहत्या पाण्याचा शोध घेतला व त्या पाण्याच्या बाजूला राहू लागला या वनस्पतीच्या माध्यमातून मिळालेल्या अन्नाचा साठा करुन भुकेच्या वेळी हे अन्न वापरता येईल. पुन्हा त्याच अन्नासाठी जास्त कष्ट घ्यावे लागणार नाहीत हे ही त्याने जाणून घेतले.

**१.१.१ आगीचा शोध**

त्यानंतर झाडे एकमेकांवर घासून घर्षणामुळे आग तयार होते व त्या आगीचे रुपांतर वणव्यात होते. या वणव्यात काही प्राणी भाजून गेले त्या प्राण्यांचे सेवन मानवाने केले तेव्हा त्याला आगीत प्राणी भाजून खाल्ल्यावर ते चविष्ट लागले व अन्न लवकर पचते याचे त्याला ज्ञान झाले. यात काळात अनेक शोध लागले व मानवाची उत्क्रांती होत गेली. हा काळ इ. सन पूर्वीच्या १३ व्या ते १४ व्या शतकाचा काळ आहे.

**१.१.२ यांत्रिक युग :**

उत्क्रांती झाल्यावर यंत्रांचा शोध लागला. यंत्र शहरात असल्याने मानव शहराकडे जावू लागला. कारण शेतीपेक्षा यंत्रावर काम केल्याने जास्त पैसा मिळतो. हे त्याला जाणवले. शहरात लोक एकत्र राहू लागले.

१३ व्या व १४ व्या शतकास प्रबोधनाचे युग किंवा औद्योगिक युग म्हणून संबोधले जाऊ लागले. याच काळात सर्वात जास्त माहितीची गरज लोकाना भासू लागली. १४ व्या शतकात छपाईचा शोध गुटेनबर्ग याने

लावला. अनेक यंत्राचे शोध लागल्याने कामाची गती वाढली. व लोकांना यंत्रांची गरज भासू लागली. या युगामुळे माणसाच्या जीवनात गती निर्माण झाली या काळात समाजशास्त्रीय चौकटीतही लक्षणीय बदल झाले. प्रबोधन युगाच्या पूर्वी आणि नंतर माणसाला माहितीची गरज होतीच. काळाच्या ओघात ही गरज वाढत गेली. **प्रबोधन युगाच्या दरम्यान आणि नंतर अवतरलेल्या यंत्र युगामध्ये ही गरज अधिक प्रमाणात वाढली.** आजमितीस ही गरज किती वाढली हे शब्दात सांगता येणे अशक्य होऊन बसले आहे.

अगदी ढोबळ मानाने विचार करावयाचा झाल्यास भारताच्या अलिकडील इतिहासातील पाचपन्नास वर्षाचे चित्र आपल्याला आठवून पाहता येईल.

### १.१.३. यांत्रिक युगाची क्रांती :

भारतात १० ते १५ वर्षापूर्वी मोबाईल, खाजगी टी.व्ही. चॅनल नव्हते. २० वर्षापूर्वी संगणकही नव्हते. त्यानंतर इंटरनेट, ई-मेल, गुगुल, ॲमेझॉन हे १० वर्षापर्यंत नव्हते. २५ वर्षापूर्वी कलर टी.व्ही. नव्हते. ४० वर्षापूर्वी ब्लॅक अँड व्हाईट टी.व्ही. नव्हते. टी.व्ही. आल्यावर तो २४ तास चालू राहील, १०० चॅनल दिवसाकाठी २४ तास उपलब्ध होतील असे वाटत नव्हते. ५० वर्षापूर्वी ट्रान्झिस्टर नव्हते, त्यानंतर व्हीसीआर आणि रेडीओटेप आले कधी व जुने झाले कधी ते कळलेच नाही. सुमारे ६० वर्षापूर्वी जेट विमाने नव्हती. पण हे जेट विमान बनविले गेल्यावर २० वर्षानंतर माणूस चंद्रावर उतरला. आता पर्यटनासाठी चंद्रावर जाता येईल अशी सोय करता येईल का ? हे पाहतो आहे. १०० वर्षापूर्वी विमाने नव्हती. या देशातून दुसऱ्या देशात जायला बोटीने प्रवास करावा लागायचा आंतरराष्ट्रीय प्रवासाचे साधन बोट होती. म्हणून वास्को-द-गामा याने जगाचा प्रवास बोटीने केला. शहरात प्रवास करण्याचे साधन टांगे होते. त्यानंतर काही वर्षापूर्वी मोटीरींचा शोध लागला. ५० ते ७५ वर्षात काही चैनीच्या वस्तू बाजारात आल्या व त्या वस्तू घराघरात किंमती घसरल्यामुळे किंवा लोकांचे उत्पन्न वाढल्यामुळे आल्या. यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे **तंत्रज्ञानाचा प्रचंड विकास झाला.** ''जगप्रसिद्ध वैज्ञानिक आणि विज्ञान लेखन आयझॅक असिमोव्ह म्हणत की,'मानवी विकासायात्रेच्या पहिल्या पाच हजार वर्षात एकूण जितके शोध लागले नाहीत त्याहून पन्नासपट शोध गेल्या ५० वर्षात लागले आहेत'. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास मुख्यत: युध्दास कराव्या लागणाऱ्या तयारीतून झाला असला तरी, ज्याला आपण ''कन्झुमर रेव्होल्यूशन'' म्हणून आज संबोधतो. त्या क्रांतीचा आणि प्रगतीचा भाग म्हणूनही अनेक आधुनिक वस्तूंची निर्मिती झाली आहे.'

### १.१.४ औद्योगिक क्रांती :

तीनशे वर्षापूर्वी एक स्फोट झाला या स्फोटामुळे संपूर्ण जगात धक्कादायक लाटा उसळल्या आणि जुन्या संस्कृती मोडून नवीन संस्कृतीचा उदय झाला. हा स्फोट म्हणजेच औद्योगिक क्रांती होय. त्याने साऱ्या जगात लाटा उठविल्या. या लाटांचा परिणाम असा झाला की सर्व लोकांचा जीवनक्रम बदलून टाकला. जगात औद्योगिक क्रांतीचा उद्रेक झाला. प्रतिसंस्कृतीची लाट ही फार मोठ्या प्रमाणात उसळली. व तिचा परिणाम अनेक गोष्टी निर्माण होण्यात झाला. उदा:- कारखाने यंत्रे, इमारती औषधे इ.

यानंतर शेतीरक्षणकर्ते व औद्योगिक भविष्याचे कैवारी यांच्यात मोठा लढा झाला. याच काळात व्यापाराची जाळी ही औद्योगिकरणासहित अस्तित्वात आली. इ.स. १८७१ मध्ये, जॉर्ज हेडग्टन, हर्टफोर्ड याने पहिले दुकान न्यूयॉर्क मध्ये उघडले.

---

तळटीप : - १. केतकर, कुमार : टेक्नॉलॉजी नावाची सिस्टिम, लोकसत्ता, २२/१०/०५, शनिवार.

दुसऱ्या लाटेच्या तंत्रज्ञान क्षेत्राला सामावून घ्यावयाला क्रांतिकारक सामाजिक यंत्रांची आवश्यकता होती म्हणूनच या काळात लोकं शेतीकडून कारखानदारीकडे वळले व कुटुंबे छोटी झाली. मुलांचे शिक्षण शाळेत होऊ लागले. वृध्दांची काळजी घ्यायला आश्रम निर्माण झाले. तरुण वयात जीवन पद्धतीनुसार व्यक्ती राहात असेल तर औद्योगिक शिस्तीनंतर निर्माण होणारे प्रश्न सुटतात. या विचारांतून दुसरी लाट आली व संस्कृतीचे दुसरे अंग निर्माण झाले. याच काळात औद्योगिकरणाने उत्पादन व वापर यांची एकसूत्रता नाहीशी केली व उत्पादनापासून ग्राहक वेगळे झाले. पहिल्या लाटेतील एकसूत्री अर्थव्यवस्था ही दुसऱ्या लाटेत अस्थिर अशी अर्थव्यवस्था बनून गेली. याचा परिणाम अर्थव्यवस्था बाजारी बनून समाजवादी व भांडवलवादी हे दोन गट अर्थकारणात तयार झाले.

उत्पादक व ग्राहक यांच्या फुटीचा परिणाम सामाजिक फाटाफूट, कौटुंबिक जीवन, लैंगिक भूमिका, आणि समाजाच्या अंतर्गत बदल होण्यात झाला.

दुसऱ्या लाटेच्या काळात अत्यंत प्रभावी बनलेली प्रसार माध्यमे आता आश्चर्यकारक रीतीने बदलली जात आहे. तिसऱ्या लाटेचा जोर वाढला तसतसा प्रसार माध्यमांचा एकत्रित प्रभाव विस्तार पावला. त्या माध्यमांवर अनेक ठिकाणाहून हल्ले होत असल्याने माध्यमांची विघटने झाली आहेत.

उदा:- वृत्तपत्राचे वाचन हळूहळू कमी होऊ लागले. इ.सन १९५५ ते १९६५ ह्या दशकात मात्र अमेरिकेत तिसरी लाट उसळत असताना, हळूहळू उद्योगात देखील प्रभाव पडला. त्याचा परिणाम म्हणजे इ.स. १९६५ ते १९७७ च्या दरम्यान मध्यवर्ती कॉम्प्युटरचा काळ आला. व कॉम्प्युटरने प्रत्येक क्षेत्रात जागा मिळवली. ह्याच काळात कुटिरउद्योग निर्माण झाले. तिसऱ्या लाटेत बाजारीकरणाचा अंत झाला. या लाटेमुळे प्रत्येक क्षेत्रात व माणसाच्या जीवनात क्रांतिकारक बदल घडून आले.[१]

**१.१.५ तंत्रज्ञानाचे उपयोजन व त्याचे वाढते मान:**

आताच्या काळात अशा प्रकारचे कारखाने असले तरी त्यांची उत्पादन प्रक्रिया ही नियंत्रण कक्षामधून होते. बऱ्याच कारखान्यांचा मॅनेजमेंट स्टाफ हा ई-मेल वा मोबाईल फोन वरूनच काम करतो. नव्या तंत्रज्ञानामुळे स्थळ, काळ, इ. सर्व निकष बदलेले आहे. स्थळ, काळ, सापेक्षता म्हणजेच स्पेस टाइम सिंड्रोम किंवा स्पेस टाईमची व्यवस्थापकीय रिलेटिव्हीटी, शेती ते उद्योग ते नवे उद्योग या, संक्रमणात तंत्रज्ञानाने व्यवस्थापन पध्दतीत बदल घडवून आणला. माणूस शेतीवर अवलंबून होता. तेव्हा त्याचे शेती व्यवस्थापन हे कुटुंबामध्ये किंवा संबंधित सहकारी समूहात होई. या प्रकारच्या व्यवस्थापनात संवाद चांगल्या तऱ्हेने साधला जात होता.

शेतकरी आपल्या वस्तू विकण्यासाठी बाजारात उतरला तेव्हा त्याची पहिली गरज संवाद ही होती. बाजार स्थिती, बाजार भाव, निर्यातीची शक्यता, सरकारचे नियम, सर्व व्यवहारात लागणारे मध्यस्थ, दुकानदार, मंडईतले वातावरण या सर्व गोष्टी शेतकऱ्याला माहीत असल्याशिवाय शेतकरी बाजारपेठेत जाऊ शकत नाही. अशा प्रकारची माहिती माध्यमे जगात उपलब्ध आहेत.

परंतु, तिचा प्रसार करण्यासाठी माध्यम नसेल तर ती माहिती अर्थशून्य आहे. **म्हणजेच माहिती माध्यम क्रांती उर्फ इन्फर्मेशन अ‍ॅण्ड मिडिया रिव्होल्युशन शिवाय सिव्हिलायजेशन (संस्कृती) निर्माण होऊ शकले नसते.**

---

तळटीप : - १. टॉफलर, अल्विन: तिसरी लाट, मोहिते, शर्वरी, अनु.; महाराष्ट्र राज्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई. प्रथम आवृत्ती, १९९१.

### १.१.६ माहितीची माहिती:

माहिती नसेल तर माणसाला असुरक्षित वाटते आणि माध्यमे नसतील तर त्याची संवाद क्षमतातच संपते. औद्योगिक क्रांतीला ऑल्विन टॉफलर ''दुसरी लाट'' या संज्ञेने संबोधतो. औद्योगिक क्रांतीच्या पहिल्या टप्प्यात निर्माण झालेली व्यवस्थापन शैली थोडी सोपी होती. मालक - व्यवस्थापक - पर्यविक्षक - कामगार अशा औद्योगिक चार्तुवर्ण्यात ती विभागणी समजून घेता येत असे. वर्ग संघर्षाला पोषक अशी व्यवस्थापन शैली होती. त्यामुळे संप, निदर्शने, मासॲक्शन्स अशा सामुहिक कृती शक्य होत्या. आता कामगार, कर्मचारी, पत्रकार, शिक्षक - प्राध्यापक व असे इतर अनेक जण वेगळ्या प्रकारच्या माहिती माध्यमातव वातावरणात वावरतात. नव औद्योगिक क्रांती नंतर म्हणजेच संगणक - उपग्रह या मार्फत आलेली माहिती - माध्यम क्रांतीनंतर कामगार, व्यवस्थापक ह्यांच्या नात्यात फरक पडला. कारण दोघेही, ''कन्व्हेअर बेल्ट सिस्टम'' मधून एकत्र काम करण्याच्या स्थितीतून मुक्त होऊ लागले होते. कॉम्प्युटर, मोबाईलच्या मन:स्थितीमुळे सामूहिक भावना निर्माण होते. आणि वर्गीय नाते तयार होते. म्हणजेच (कर्मादरी) प्रस्थापित होते आणि आता ही कर्मादरी देखील कमी कमी होत जाणार आहे. कारण माहितीचा विस्फोट झाल्याने माहितीची गरज प्रत्येकाला आहे. यामुळे माहितीच्या माध्यमाच्या वातावरणात प्रत्येकाला वावरावे लागणार आहे.[३]

## १.२ मुद्रणाच्या शोधाचे महत्त्व :

### १.२.१ इतिहास व विकास :

इ.स. नंतरच्या दुसऱ्या शतकाच्या शेवटी चिनी लोकांनी मुद्रणाची पद्धत शोधून काढली. मुद्रणासाठी तीन गोष्टी लागत होत्या. त्या म्हणजे १) कागद २) शाई ३) मुद्रण प्रतिमा

तळटिप : - ३. केतकर, कुमार : टेक्नॉलॉजी नावाची सिस्टिम, लोकसत्ता, २२/१०/०५, शनिवार.

इ.स. ८६७ च्या सुमाराला ''बहिरक सूत्र'' नावाचे पुस्तक मुद्रित झाले. त्यानंतर १४३० च्या सुमारास धात्वालेखी मुद्रण प्रचारात आले. या प्रकाराचे मुद्रण हे धातूच्या खिळ्यावरून केलेल्या मुद्रणापेक्षा अधिक सोयीचे असे असते. या लिपीतील सर्व मुळाक्षरांचा एक संच पितळ किंवा कांस्य यांच्यापासून तयार केला जाई. त्या साच्याला शाई लावून हे मुद्रण केले जाई. १४ व्या शतकात गुटेनबर्ग याने आधुनिक मुद्रणाचा शोध लावला. १९२९ मध्ये अमेरिकेत दूरस्थ नियंत्रणाने अक्षर निर्मिती यंत्राच्या साहाय्याने अक्षर निर्मिती सुरू झाली. त्यामुळे मानवी श्रमांशिवाय किती काम होऊ शकते. याचा प्रत्यय आला व दूरस्थ नियंत्रणामुळे स्वयंचलित यंत्र आले त्यामुळे १० पटीने छपाईचा वेग वाढला. १९६० ला चुंबकीय फितीचा उपयोग प्रचारात आला. व ताशी ३६,००,००० एवढी अक्षरे जुळवणे शक्य झाले.

मुद्रणाची कला निर्माण झाल्यापासून चारशे वर्षात जेवढी प्रगती झाली, त्याच्या कितीतरी पटीनी अधिक प्रगती २० व्या शतकात झाली आहे. व अजूनही २१ व्या शतकात होत आहे.

### १.२.२. महत्त्व :

मुद्रण म्हणजे किंवा तत्सम पृष्ठभागावर ठसा उमटविणे होय. त्यावरुन मजकुराचे व चित्राचे अनेक ठसे उमटवून प्रती काढणे म्हणजेच मुद्रण करणे होय.

मुद्रण तंत्राची सुरुवात गेल्या पाच शतकांपासून झाली. तेव्हापासून सुसंस्कृत समाजावर मुद्रणाने आपले प्रभुत्व ठेवले आहे. ज्ञान प्रसाराचे व ज्ञानाचा ठेवा जतन करण्याचे प्रमुख काम मुद्रणाने केले आहे. संदेशवहन, दूरचित्रवाणी, सूक्ष्मपट, ध्वनिमुद्रण इ. प्रगत तंत्रांनी मोठे आव्हान दिले आहे. तरीही, मुद्रण तंत्राला स्वतंत्रपणे क्षेत्र उपलब्ध आहे. पुस्तके, वर्तमानपत्रे यासाठी मुद्रणतंत्र मर्यादित न राहता कापडांवर, पत्र्यावर, भिंतीच्या कागदावर, वेष्टनांवर किंवा मोठ्या जाहिरीतीवर मुद्रणाच्या

अनेक तंत्रापैकी एकाचा वापर करुन मुद्रण केले जाते. अतिसूक्ष्म अशा इलेक्ट्रॉनिक मंडलाच्या उत्पादनासाठी सुध्दा मुद्रण तंत्राचा उपयोग होता.

ज्या काळात विज्ञानाचे अनेक शोध लागले त्याच काळात मुद्रणाचा शोध लागला त्यामुळे ज्ञान प्रसाराला फार मोठी मदत झाली. संस्कृतीला आर्थिक, सामाजिक चालना मिळून जगातील ज्ञान हे मुद्रणामुळे पसरले त्यामुळे मुद्रण शोधाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले. विशेषत: आर्थिकदृष्ट्या प्रगत अशा वर्गाला या ज्ञानप्रसाराची फार मदत झाली.

मुद्रणामुळे ज्ञानसाठा व त्याची वाढ होण्यास फार मदत झाली. प्रत्येक पुढील युगाला ज्ञानाचा मागचा साठा मिळाला. त्या काळातील लोकांनी पूर्वीच्या ज्ञानाचा उपयोग करुन नव्या ज्ञानात भर घातली. फ्रेंच साहित्यिक दनी दिद्रो यांनी १८ व्या शतकात विश्वकोश प्रसिध्द केला तेव्हापासून आतापर्यंत ज्ञान साधनात प्रचंड वाढ झाली. त्याचबरोबर १९ व्या शतकातील औद्योगिक क्रांतीची व २० व्या शतकातील वैज्ञानिक व तांत्रिक प्रगतीची फार मोठी भर पडली. औद्योगिक क्रांतीमुळे आणि सुधारणांमुळे समाजाचे जे आर्थिक संक्रमण झाले. त्याला मुद्रणामुळे मदत झाली. व सामाजिक बदल त्यामुळे शक्य झाले. मानवी हक्क संहिता, अमेरिकेची राष्ट्र घटना, फ्रेंच राज्यक्रांतीनंतर झालेला वैचारिक बदल आणि १९ व्या शतकातील महत्त्वाचे सामाजिक परिवर्तन या सर्व गोष्टी मुद्रणाच्या प्रगतीमुळे शक्य झाल्या. व त्यांचे पुढील पिढ्यांसाठी जतन झाले. पुस्तके, मासिके आणि इतर मुद्रित गोष्टी यांच्या साहय्याने ज्ञानाच्या सर्वसामान्य गोष्टी समाजाच्या पुष्कळ थरांपर्यंत सहज पोहोचल्या. जेथे साक्षर समाज मोठा आहे. त्या देशांमध्ये ज्ञानप्रसार होण्यासाठी मुद्रणाची फार मदत होते.[४]

---

तळटिप : - ४. जोशी, लक्ष्मण शास्त्री, संपा.: मराठी विश्वकोश खंड, १३, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, १९८७.

### १.३ माहितीचे युग :-

माहिती युगात माहितीची निर्मिती वाढली आहे आणि गरज देखील वाढली आहे. याचा समन्वय साधून कमीत कमी वेळात जास्तीत जास्त माहिती देण्याचे प्रयत्न संगणकाच्या साहाय्याने चालू आहेत.

या संगणकाच्या युगात नवीन नवीन संकल्पना येत आहेत. त्यातील Information Lifecycle Management (ILM) ही सकल्पना पुढे आली.

या संकल्पनेनुसार माहिती व्यवहारात व्यवसाय करण्यासाठी लागते म्हणून माहिती ही वाढत आहे. माहिती dynamic पध्दतीने माणसांच्या गरजेनुसार वाढत आहे. माहितीची वाढ ही सहकारी तत्वावर मोठ्या प्रमाणात होत असते. माहिती संगणकाच्या युगात शोधताना मूळच्या माहितीची (Data) तीन प्रकारात विभागणी केली जाते.

**१. Operational Data :**

Operational Data हा माहिती तयार होताना संदर्भासाठी दिला जातो.

**२. Transitional Data :**

Transitional हा महत्त्वाचा असतो परंतु त्याच्यातून माहिती तयार होत नाही.

**३. Reference Data :-**

Reference Data हा महत्त्वाचा असतो. पण त्याची सारखी गरज भासत नाही.

ही सर्व मूळ माहिती संगणकात साठविली जाते. संगणकामुळे इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या साहाय्याने माहिती ही दिली जाते व साठविली जाते. संगणकामुळे माहिती ही अफाट प्रमाणात साठविली जाते व तिचा उपयोग करुन घेतला जातो.

संगणकाच्या साहाय्याने माहिती - e-Mail, Internet, Intranet, Extranet. याद्वारे नवीन माहिती

करुन घेतली जाते व इतरांना योग्य ती माहिती दिली जाते. माहितीची गरज ही प्रत्येक माणसाला पावलो पावली लागत आहे. यंत्रयुग व नवनवे शोध यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यातील माहिती ही जाणून घेण्याचा कल हा प्रत्येकाचा वाढत आहे. माहितीमुळे जगात बदल होत आहेत. संगणक युग आल्यामुळे माहितीच्या महासागरातून माहिती शोधण्यासाठी Keywords वापरतात. यामुळे नेमकी माहिती नेमक्या माणसालाच दिली जाते. या संगणक युगालाच माहितीचे युग असे म्हणतात.[५]

समाजात जेव्हा अनिश्चितता निर्माण होते तेव्हा माहिती ही साधन संपत्ती ठरते आणि तिला आर्थिक मूल्य प्राप्त होते. माहितीचा वापर होतच असतो. याचे वर्तमानपत्र हे उत्तम उदाहरण आहे. कायदेशीर तरतुदीनुसार माहितीवरून मालकी हक्क प्रस्थापित करता येतो.

उदा:- पेटन्ट आणि कॉपीराईट

ज्यांच्यावर मालकी हक्क सांगता येतो, त्या गोष्टीचे हस्तांतरण होऊ शकते. पेटन्ट ही संशोधनाची बौद्धिक मालमत्ता आहे. आणि ती विकता येते. व विकत घेतली जाते. या रीतीने माहितीच्या युगातील माहिती ही क्रयविक्रय होऊ शकणारी बाजारातील वस्तुंप्रमाणे एक वस्तू आहे.

Data एकत्र करून त्याचे महत्वाचे संदर्भ, संदर्भाचे शब्द हे प्रोग्रामच्या साहय्याने एकत्र करतात आणि माहितीचा शोध कुठल्याही संदर्भाने घेता येण्याची तरतूद केलेली असते. माहितीचा पाया हा वेगवेगळ्या प्रकारची माहिती, अंर्तगत संबंध, माहितीचे घटक आणि शोध घेण्याची क्षमता यावर अवलंबून असतो. माहिती ही प्रत्येक क्षणाला वाढत असते. माहिती ही खूप प्रमाणात एकत्र केली तरी माहितीचा उपयोग करणाऱ्या उपभोगकर्त्याला Computer System मुळे योग्य माहिती मिळते.

तळटीप : - ५. Joel, Schwartz, : The First Step in ILM (Information Lifecycle Management) Implimentation is networked storage, Expres Computer, 17/10/2005

अशा प्रकारे संगणक युगात माहिती मिळवून ती योग्य माणसांपर्यंत पोहोचविणे किंवा गरजेनुसार योग्य माहिती घेणे व या माहितीचा संस्थेत, शिक्षणात, संशोधनात कारखान्यात, प्रयोगशाळेत इ. ठिकाणी वापर करुन नवे शोध, तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी उपयोग करणे यामुळेच या युगालाच "माहितीचे युग" असे म्हणतात.[६]

## २. माहिती:

"माहिती" ह्या संज्ञेची नेमकी व्याख्या करणे अवघड आहे पण ही मानवाची निर्मिती आहे. ती अनुभव, निरीक्षण, विचारांची देवाण-घेवाण, लेखन आणि वाचन यांतून प्रवाहित होत असते. आधुनिक संशोधनात माहितीच्या संप्रेषणाचा मुक्त प्रवाह महत्वाचा असतो. कारण आजचे आर्थिक जीवन, एकूण जीवनमान आणि प्रगती या संशोधनावर आधारित आहे.[७]

"माहिती" ही संज्ञा अतिशय व्यापक स्वरुपात उपयोगात आणली जाते व तिचा नेमका अर्थ सांगणे कठिण आहे . ती वेगवेगळ्या रुपात निर्माण करून पुरवावी लागते. कारण सर्वच क्षेत्रात नवीन नवीन शोध लागत आहेत. त्याच बरोबर नवीन तांत्रिक घटक प्रचारात येत आहेत. ह्या घटकांची पूर्तता करण्यासाठी माहितीची गरज भासत आहे त्यासाठी माहितीचे सतत संप्रेषण होणे गरजेचे आहे.

नव्या घटका बाबत माहिती मिळवून एकत्र करणे आणि तिचे संप्रेषण करणे यासाठी शास्त्रीय पद्धतीची गरज आहे. या गरजेतून माहितीशास्त्राचा उदय व विकास झाला आहे. इतरांपेक्षा वेगळा विचार प्रकट झाला तर त्याला माहितीची निर्मिती असे म्हणतात. तो विचार इतरांना

तळटिप : - ६. Kamal Vijayan : knowledge and Information Management Dolhi. Istod.: Macmillain,2004.
७. नरगुंदे, रेवती: प्रलेख आणि माहिती शास्त्र तत्वे, तंत्रे, पध्दती, केंद्र आणि विकास, पुणे. युनीवर्सल प्रकाशन दुसरी आवृत्ती, २०००, पृ. ९४.
८. नरगुंदे, रेवती : प्रलेख आणि माहिती शास्त्र तत्वे, तंत्रे, पध्दती, केंद्र आणि विकास, पुणे. युनीवर्सल प्रकाशन दुसरी आवृत्ती, २०००, पृ. ९६

माहिती कळावी म्हणून त्या माहितीला प्रसिद्धी दिली जाते आणि तेथूनच माहितीशास्त्र काम करू लागले.[८]

**२.१ माहितीचे महत्त्व व व्याख्या:**

'माहिती' या संकल्पनेची चपखल व्याख्या करणे कठिण आहे, हे सर्वसामान्यपणे सांगितले जाते. ग्रंथपाल जेव्हा माहिती विषयी बोलतात तेव्हा माहिती म्हणजे नेमके काय ते सांगू शकत नाहीत तर माहितीच्या संदर्भात जे जे काम करतात ते सांगतात.

उदा:- माहितीचे संपादन, माहितीवरुन होणारे उपस्कार, तिचा होणारा संक्षेप पुनर्मांडणी आणि प्रसारण.

१. ब्रायनर व्हिकरी यांची व्याख्या, ''माहितीमुळे संकल्पना बदलतात''.

२. मॉन्डेड कोच यांची व्याख्या '' माहिती ही अनिश्चितता संपविते''.

जसजसे ग्रंथालय व माहितीशास्त्र विकसित होत गेले तसतसे इतर शास्त्रांमधील संकल्पना व तंत्रे यांचा स्वीकार होऊ लागला.

उदा:- व्यवस्थापनातील मूल्यमापनाची संकल्पना.

ग्रंथालयात माहितीसेवा दिल्या जातात. या सेवांच्या मूल्यमापनाची गरज निर्माण होताच, ग्रंथालयांना उपभोक्त्यांच्या माहिती विषयक गरजांचा अभ्यास करणे अनिवार्य ठरले. माहितीचे व्यवस्थापन, वितरण आणि वापर, या संदर्भात प्रथम व्यवस्थापन शास्त्र आणि मानसशास्त्र या दोन्ही शास्त्रांतील संकल्पनांचा ग्रंथालय व माहितीशास्त्रांत प्रवेश झाला.[९]

''माहिती आणि तपशील या संकल्पनांच्या जवळ ''ज्ञान'' ही संकल्पना येते. तपशील उर्फ डेटा म्हणजे

तळटिप : - ९. रिसबडकर, म. रा. इन्फॉर्मेशन ॲण्ड कमोडीटी, ज्ञानगंगोत्री, वर्ष पहिले, सप्टेंबर - नोव्हेंबर, २०००, अंक २.

घटना, घडामोडी इ. ही असंघटित व प्रक्रियारहित माहिती असते. या विखुरलेल्या तपशीलांची तर्कशुद्ध पद्धतीने केलेली सुनियोजित, सुसंघटित संरचना म्हणजे माहिती''.

उदा:- जगाच्या लोकसंख्येची आकडेवारी वा हवामान विषयक माहिती हा तपशील ठरेल परंतु, या आकडेवारीवरून काढलेले निष्कर्ष किंवा हवामानावरुन काढलेले पिकांचे निष्कर्ष हे तपशीलांचे विश्लेषण करुन पुढे आलेली माहिती असते.

तपशीलावर प्रक्रिया केल्यानंतर विश्लेषणातून माहिती आकारास येते. या प्रक्रियेचा सखोल व व्यापक विचार केला तर 'ज्ञान' या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट होईल. 'तपशील' व 'माहिती' हे ज्ञानाचे मूलभूत घटक आहेत. माहितीचे विश्लेषण वा संरचना केली असता तिचे ज्ञानात रुपांतर होते. स्वत:चे अनुभव, जाणीवा व कुवतीनुसार ती व्यक्ती माहितीचे विश्लेषण करते म्हणून त्या त्या व्यक्तीनुसार ज्ञानात रुपांतर होण्याची प्रक्रिया वेगळी आहे.

माहिती व तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे माहिती व्यवस्थापन होऊ लागले आहे. माहितीचे उत्पादक व मध्यस्थ ज्ञानसाठ्याचा उपयोग करुन नवीन बदल माहितीत घडवून ती माहिती प्रसारित करण्याचे प्रयत्न करतात.[१०]

प्रत्येक संस्थेत माहिती ही येत असते. त्या माहितीची व्यवस्था करावी, उपयोगात आणावी, ज्यामुळे अधिकाधिक फायदा मिळेल हे निश्चित झाले आहे. माहिती व्यवस्थापनाची तंत्रे, त्याची साधने आणि पद्धती याद्वारे भरपूर माहितीतून फायदा मिळेल हे साध्य होऊ शकते. माहिती व्यवस्थापनाच्या सरावातून, योजनाबद्ध कार्यक्रमातून संस्थेच्या संदर्भाने अनेक आश्चर्यकारक परिणाम होऊ शकतात.

ग्राहक प्रत्येक व्यवहारात आनंदी राहू शकेल. तसेच तो अधिक उत्पादनक्षम श्रीमंत होईल. बदलते नियम,

तळटिप : - १०. पौडवाल, सुषमा : ज्ञानाचे अग्रदूत, ज्ञानगंगोत्री, वर्ष पहिले, सप्टेंबर - नोव्हेंबर, २०००, अंक २.

बदलती क्षितीजे, नाविन्यपूर्णता, यांचा ध्यास असणाऱ्या कंपनीसाठी माहिती एक 'चालणारी किल्ली' आहे. त्याच बरोबर **माहिती व्यवस्थापन संस्थेला खालील प्रमाणे मदत करते.**

१. कल्पनांचा मुक्तस्त्रोत विस्तारित करुन प्रत्येक क्षेत्रात नाविन्यपूर्णता आणणे.

२. प्रक्रियेचा वेळ अधिक मर्यादित किंवा कमी करुन ग्राहकांना सेवा कमीत कमी वेळात देणे.

३. कामगार वर्गाची धारणशक्ती वाढविणे, त्यासाठी कामगारांच्या माहितीचे मूल्य जाणून त्यांना त्यासाठी पुरस्कृत करणे.

४. अनावश्यक प्रक्रिया कमी करुन, किंमती कमी करुन व्यवहार मर्यादित करणे.[११]

**२.२ माहितीचे व्यवस्थापन व त्याची गरज :**

माहितीचे व्यवस्थापन म्हणजे जुने सामान हे नवीन बॉक्समध्ये घातल्याप्रमाणे आहे. माहितीचे व्यवस्थापन प्रकाशक मोठ्या प्रमाणावर करतात. माहितीच्या व्यवस्थापनावर प्रत्येक वर्षी Conferences घेतल्या जातात. माहितीचे व्यवस्थापन वेगवेगळ्या पद्धतीने वेगवेगळ्या मार्गाने केले जाते. माहिती व्यवस्थापन ही संकल्पना गोंधळाची आहे कारण बरेच विषय हे स्वतंत्र व सखोल अभ्यासाचे असतात. त्या विषयांची माहिती ही साचेबध्द रीतीने एकत्र करुन, पुर्नसंघटन करून ठेवावी लागते. काही विषयात दोन स्वतंत्र विषय एकत्र येतात यामुळे अशा ठिकाणी दोन्ही विषयाची माहिती एकत्र करावी लागते.

मोठ्या पातळीवर माहिती व्यवस्थापन म्हणजे प्रलेख हाताळणी होय. ग्रंथपालाला 'माहितीचे व्यवस्थापन करणारा' हे आधुनिक नाव आहे. माहितीचे व्यवस्थापन करून ती माहिती पुरविणे म्हणजे ''संवाद साधणे'' होय.

माहितीचे व्यवस्थापन करणारे लोक हे वेगवेगळ्या क्षेत्रात लागतात. विषयांना बळकटी येण्यासाठी माहिती व्यवस्थापनाचा वापर हा तंत्रज्ञानानुसार केला जातो. ह्या तंत्रज्ञानामुळे संस्थांना गरज असलेली अंर्तगत व बाह्य ह्या दोन्ही प्रकारची माहिती एकाच वेळी मिळू शकते.

माहिती व्यवस्थापन हे पुढील घटकांवर अवलंबून असते.

1. Information Technology (IT)
2. Management Information System (MIS)
3. Stragic Information Management System
4. Information Resources Management (IRM)
5. Information Processing
6. Information System

(उत्तरार्ध पुढील अंकात)

श्रीमती स्वप्ना बाबुराव वर्तक
श्री मंगेश अपार्टमेंट, रुम नं. १०१,
साईनाथ नगर, बोरिवली (प.)

दिशा
नियमित
वाचा

तळटिप : - ११, रिसवडकर, म.रा.: इन्फॉर्मेशन ॲण्ड कमॉडीटी, ज्ञानगंगोत्री, वर्ष पहिले, सप्टेंबर - नोव्हेंबर, २०००. अंक

# ध्येयपूर्ती हेच जीवन

*ध्येयाप्रत वाटचाल करणे हा मानवी जीवनाचा अस्तित्व हेतू आहे. या ध्येयप्राप्ती संबंधी - संपादक*

जीवनात आपण जगताना ध्येय मनात जरूर ठेवले पाहिजे. व त्या करता मार्गक्रमण केले पाहिजे. हळूहळू का होईना पण आपण त्या दिशेने चालत राहिलो तेव्हा एक वेळ अशी येईल की आपण आपल्या ध्येयाच्या जवळ येऊन पोहचू. जेव्हा आपण ध्येय पादाक्रांत करू तो क्षण, तो आनंद आपल्यासाठी आगळा-वेगळा असेल यात तीळ-मात्र शंका नाही. ध्येय का बरे असावे ? कारण त्याच्या पूर्ती मुळेच आपल्या जीवनात यश, पैसा, भौतिक सुख, आत्मिक सुख वगैरे मिळतील. म्हणूनच

जगा ध्येय ठरवून आपले
असेच जगण्यात हशिल नाही.

असेल माझा हरी, तर देईल खाटल्यावरी असे म्हणून कधीच आपण शांत बसून चालणार नाही. कारण एकदा का आपल्याला स्वस्थ बसून रहायची सवय लागली की आपण आपला आमुल्य वेळ त्यात फुकट तर घालवतोच व चांगल्या संधीला मुकतो. एकदा का वेळ टळून गेली की ती परत येत नाही हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. आपल्या जीवनात अनेक बाबींचा इतर कामात वापर करून घेता आला पाहिजे. आपल्या अभिवृत्तीला देखील यात महत्त्व आहे. आपली अभिवृत्ती म्हणजे मनाची जडण-घडण आपल्याला बनवता आली पाहिजे. आपण जसे आपले घर सजवतो म्हणजे अंतर्गत सजावट करतो तेव्हा ते सुंदर दिसेल याची काळजी घेतो. तसेच प्रत्येक वेळी कामाच्या बाबतीत आपल्या मनाची अंतर्गत सजावट चांगली करणे आवश्यक आहे व ते तसे अगदी सोपे आहे. आपल्याला एखादी वस्तू बाजारातून आणायची असेल तर आपण नेमके काय करतो? आपल्या घरातील दुसऱ्या व्यक्तीवर सोपवतो व आपल्यालाच आणायची असेल तर आपण आता दुकान बंद झाले असेल. अशी सबब पुढे करतो. व यातूनच प्रत्येक बाबतीत आपल्याला तशी सवय लागते. म्हणून जर का यश मिळवायचेच असेल तर त्या संबंधित असो अथवा नसो आपण बारीक-सारीक गोष्टीतसुद्धा लक्ष दिले पाहिजे कारण त्यातूनच आपल्याला चांगल्या गोष्टीची सवय लागते व आपल्याला यश मिळवण्यासाठी ह्या गोष्टी सहाय्यभूत ठरतात. तर आपल्या जीवनात काही वेळा कलहाचे प्रश्न येतात. परंतु अशा वेळी आपले मानसिक संतुलन आपण बिघडवता कामा नये. जेव्हा माणसाचे मानसिक संतुलन बिघडते तेव्हा असलेल्या समस्या अधिक गुंतागुंतीच्या होतात. व त्यातून मार्ग काढणे कठीण होऊन बसते. तसेच आपण आपल्या जीवनात भरकटत जाण्याची शक्यता ही अधिक असते. व अशा भरकटण्यामुळे आपण आपल्या ठरवलेल्या ध्येया पासून चार हात दूरच जातो.

बऱ्याच वेळा आपल्या इच्छाशक्तीचे बळ कमी पडते. कधी नकारात्मक विचार मनात डोकावू लागतात. अनिच्छा निर्माण होते. तर कधी आपल्या समोर कोणतेच ध्येय नको असे आपल्या मनात येते. आळस हा देखील ध्येयातील मोठा अडचणीचा भाग आहे. आळसामुळे आपली कार्यशक्ती कमी अथवा मंद होते. मनातील चैतन्य आपण हरवून बसतो. व नवे काही आपल्या मनात रहात नाही. म्हणून आपण आपल्या आळसाकडे अधिक गंभीरतेने पाहिले पाहिजे. व प्रयत्न पूर्वक आपण आपल्याला येणाऱ्या आळसाला दूर केले पाहिजे. आळस झटकून टाकला पाहिजे. आठ तास काम करण्याची सवय आपण आपल्याला लावून घेतली पाहिजे. एखादे ध्येय जेव्हा

आपण मनात ठरवतो तेव्हा त्यात येणाऱ्या अनेक अडथळ्यांशी सामना करण्याची तयारी आपण मनात ठरवली पाहिजे. ध्येय-पूर्ती मनात रूजवली पाहिजे. आपल्या ध्येयाकडे आपण तटस्थपणे न बघता आत्मीयतेने बघायला शिकले पाहिजे.

कारण आत्मीयताच आपल्याला अर्धे यश मिळवून देतो. मन लावून जेव्हा आपण ध्येया करता झटतो तेव्हा यश आपलेच असते. शेवटी आपण आपले ध्येय म्हणजे आपल्याला जीवनात काय करायचे आहे हे आपण ठरविलेच पाहिजे. एखाद्या ध्येया बाबतीत आपण यशस्वी झालो म्हणजे स्वस्थ बसून चालणार नाही. नवनवीन ध्येय आपल्या समोर ठेवली पाहिजेत व त्या करता झटले पाहिजे. आपण आत्मसंतुष्ट असता कामा नये कारण आत्मसंतुष्टतेमुळे आपली प्रगती खुंटते. आपल्या ध्येया बाबतीतली भूक आपण वाढवली पाहिजे. फक्त अजीर्ण होणार नाही ना याची काळजी घेतली पाहिजे. आपली झेप आपल्या आवाक्यात आहे ना याची पडताळणी करून मगच ह्याचा आपण आराखडा तयार केला पाहिजे. आपल्या अवाक्या बाहेरच्या ध्येय पूर्तीसाठी मात्र आपण झगडू नये कारण त्यामुळे नैराश्य येण्याचीच शक्यता अधिक असते. शेवटी ध्येय-पूर्ती हेच जीवन असे आपण मनात ठेवून आपले जीवन व्यतीत करणे आवश्यक आहे. कारण त्यामुळेच आपला सर्वांगीण विकास होणे शक्य असते.

प्रसन्न गोविंद कुलकर्णी
५ हेमकुंज, झवेर मार्ग
मुलुंड (प.), मुं.-८०.
फोन नं. २५६१२३८८

पृष्ठ क्र. ४ वरुन

**'आत्मस्फूर्ति' दाय नेम 'मूर्ति'**

चैतन्यावस्थेत ठेवू शकतात. एकदा त्याची जाणीव झाली की, मी - माझं ह्या शब्दांच क्षितीज आपण-आपलं आणि विश्वाचं या कक्षेपर्यंत रुंदावते. अशी व्यक्तिमत्त्वंच समाजाला दिशा देऊ शकतात, त्याला पुढं नेऊ शकतात आणि या पृथ्वीवरच नंदनवन फुलवू शकतात.

सुधा मूर्ती, नारायण मूर्ती अशी असामान्य व्यक्तित्त्वं पाहिली की अखंडपणे कर्म-यज्ञ धगधगत ठेवणाऱ्या या कर्मयोग्यांसाठी

'दिव्यत्त्वाची जेथे प्रचिती,
तेथे कर आमुचे जुळती ।

एवढा विचार मनात येतो

प्रा. कीर्ति आगाशे
एम.ई.(इलेक्ट्रॉनिक्स)
इन् चार्ज, विभाग प्रमुख
इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स
वि. प्र. मंडळ तंत्रविकेतन, ठाणे.

दिशा
नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# मेंदू विषयक संशोधन व शिक्षण (भाग २)

*मानवी मेंदू हा अभ्यासकांच्या जिज्ञासेचा खूप जुना विषय आहे. या मेंदूविषयीचा पाहिला लेख आपण एप्रिलच्या अंकात वाचला होता त्याच्या पुढील भाग - संपादक*

मानवी मेंदू हा एक चमत्कार आहे, माणसाचे वेगळेपण किंब्हुना माणूस पण अधोरेखित करणारा हा घटक आहे. आज मानवाच्या प्रगतीचा तो आलेख आपल्याला दिसतो, त्याचे सारे श्रेय या मानवी मेंदूतील निओकॉर्टेक्स या भागामध्ये मेंदूची रचना समजण्यात आली आहे होती. पुन्हा एकदा त्यावर प्रकाश टाकू -

मानवी मेंदूची रचना तीन भागात झाली आहे -

**१) सरपटणाऱ्या प्राण्यांचा मेंदू (Reptalian Brain)** - हा सर्वात लहान मेंदू आहे व तो सर्व सरपटणाऱ्या प्राण्यांमधे आढळून येतो. श्वसन, अभिसरण, पुनरुत्पादन व शारीरिक धोके यांमधे हा मेंदू कार्यरत होतो. कोणत्याही बाह्य घटकांकडून या मेंदूला धोका जाणवला तर इतर दोन मेंदू मधील रक्त प्रवाह या मेंदूकडे पुरवला जातो. या मेंदूमधे भाषिक कौशल्य आत्मसात करण्याची क्षमता नसते.

**२) मॅमेलियन (सस्तन प्राण्यांचा मेंदू) किंवा (Limbic Brain) (भावनिक मेंदू)** - हा भावनांचा केंद्रबिंदू आहे. या मध्ये भावनिक प्रसंग एकत्रित करण्यासाठी महत्वाचा असलेला amygdala व स्मृति व मूल्ये जतन करण्यासाठी महत्त्वाचा असलेला hippocampus यांचा समावेश असतो. हा मेंदू, भीती, चिंता, प्रेम, जिव्हाळा यासारख्या भावना व चव, गंध या सारख्या इंद्रियांद्वारे मिळालेल्या माहितीनुसार परिणामकारक बदल घडवून आणतो. अनुभवांनुसार बदल घडवून आणण्यासाठी हा मेंदू जबाबदार असतो.

**३) निओकॉर्टेक्स (नवबाह्यक)** - मेंदूचा ८५% भाग हा निओकॉर्टेक्स ने व्यापलेला असतो. निओकॉर्टेक्स, हे ज्ञानग्रहणाचे व कौशल्ये विकसित करण्याचे केंद्र आहे. सर्व विचार, बौद्धिक व भाषा विकास व तार्किक विचार दृष्टींचा विकास निओकॉर्टेक्स् मधे होतो.

डावा मेंदू व उजवा मेंदू अशा दोन Neocortex भागात ही विभागणी होते. निओकॉर्टेक्सची चार प्रमुख केंद्रे आहेत.

**१) फ्रंटल लोब (ललाट पाली)** - आपल्या इच्छेनुसार शारीरिक हालचाल करणे, एखाद्या गोष्टीवर ध्यान केंद्रित करणे, समस्यांची उकल करणे, भाव भावनांवर नियंत्रण ठेवणे, भाषेची समज, या भागामुळे शक्य होतात.

**२) पॅरिएटल लोब (पार्श्विका पाली)** - स्पर्श, वेदना, दाब, तापमान यांचे ज्ञान हा भाग करुन देतो.

**३) टेपोरल लोब (शंख पाली)** - संवेदनांचे बौद्धिक स्तरावर विश्लेषण करुन त्यांतून अर्थ लावण्याचे काम ही पाली करते.

**४) ऑसिपिटल लोब (पश्चकरोटी पाली)** - डोळ्यांनी ग्रहण केलेल्या दृष्य प्रतिमा एकत्र करण्याचे आणि त्या प्रतिमांचा परस्पर संबंध ताडून त्यापसून अन्वयार्थ लावण्याचे कार्य ही पाली करते.

डाव्या मेंदू मधे - भाषेची (वाचिका), गणिती व विज्ञान कौशल्ये, शाब्दिक कौशल्ये (verbal skills) कारण मीमांसा करणे व विचार कौशल्य यांची केंद्रे असतात.


उजव्या मेंदूमधे - आकृतिबंध (patterns) तयार करणे, संगीत, विविध कला व भाषेची श्रवण केंद्रे असतात.




**The cerebrum - The cerebrum consists of a left hemisphere and a right hemisphere. Each hemisphere is divided into four lobes by grooves in the cortex, a layer of nerve cell bodies that covers the cerebrum. This diagram shows the left cortex and indicates some major functions of each of its parts.**

डावा मेंदू शरीराच्या उजव्या भागावर नियंत्रण ठेवतो तर उजवा मेंदू शरिराच्या डाव्या भागावर नियंत्रण ठेवतो. दोन्ही मेंदू हे कॉर्पस कॅलोसम (corpus callosum) याने जोडलेले असतात. मेंदू हा दोन भागात अशासाठी विभागलेला असतो की मेंदूच्या एका भागाला इजा झालीच तर दुसरा भाग सारे कार्य पार पाडू शकतो. हे शरिरातील इतर भागांच्या बाबतीतही असेच असते. उदा. - फुफ्फुसे, किडनी, डोळे, कान, हात, पाय. जन्मत:च जर एका मेंदूला इजा झाली असल्यास, न इजा झालेला मेंदू हा इजा झालेल्या मेंदूची सर्व कार्य करण्यास सक्षम असतो. ज्या नवजात बालकांचा, मेंदूवरील शस्त्रक्रिया करुन एक भाग काढून टाकण्यात आला आहे त्या बालकांचा शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास वाढ ही सर्व सामान्य बालकांसारखीच झाली असल्याचे संशोधनात आढळून आले आहे.

मेंदू मध्ये अब्जावधी न्यूरॉन्सचे जाळे असते. प्रत्येक न्यूरॉन हा दुसऱ्या न्यूरॉनला ॲक्झॉन ने जोडला गेलेला असतो. या जोडणीमुळे संवेदना पोचवण्याची क्रिया घडत असते. जन्मत:च न्यूरॉन्स तयार होण्याची क्रिया अत्यंत वेगाने होत असते व त्यामुळे ॲक्झॉन वरील चरबीचा थर (Myellin sheath) हा अधिक अधिक दाट होत असतो. याला Myellination असे म्हणतात. त्यामुळे मुलांना अत्यंत समृध्द व अधिकाधिक जीवनानुभव देणे महत्त्वाचे आहे. हे वेगाने तयार होते असलेले न्यूरॉन्स जर वापरले गेले नाहीत तर ते झडून जातात व पुन्ह उत्पन्न होत नाहीत Myellination ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे.





Birth 15 Months 2 years

पालकांनी व शिक्षकांनी हे विचारात घेणे अत्यंत गरजेचे आहे की मुलाच्या शिक्षण प्रक्रियेमधे सर्व प्रकारचे म्हणजे शारीरिक, बौद्धिक, भाषिक अनुभव देणे व जे उपक्रम या अंगाने मुलाचा विकास घडवून आणतील अशा उपक्रमांचे आयोजन करणे आवश्यक आहे. त्यासाठी मुलांसमोर आवश्यक त्या संधी सतत उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. पंचेद्रियांनी ज्ञान ग्रहण करण्याची बालकाची क्षमता या काळात प्रबळ असते. क्रिया करणे, चुका करणे, चुका दुरुस्त करणे, परत परत करुन पाहणे, तोडणे-जोडणे, पडणे एखादी केल्यावर पुढे काय अपेक्षित आहे याचा अंदाज बांधायला मुले शिकतात. सभोवतालच्या वातावरणातून, सामाजिक संपर्कातून मुले ज्ञानाची बांधणी करत असतात. अनुभव किंवा कृतिशिवाय नुसतेच प्रौढाच्या सांगण्यावरुन मुले क्रिया करत गेली किंवा नुसतीच ऐकत गेली तर मिळालेल्या माहितीचा मुलाला योग्य ठिकाणी वापर करता येईलच असे नाही. स्वयंकृतीतून, अनुभवातून मुले ज्ञानाची बांधणी करत असतात. प्रौढांनी मुलाचे मार्गदर्शक म्हणून भूमिका घेतल्यास मुलाच्या शिक्षणाला दर्जात्मक गुण प्राप्त होईल. ज्या शाळा मुलांच्या अनुभवातून शिकण्याला, प्रयोगशील वृत्तीला, स्वातंत्र्याला महत्त्व देतात त्या मेंदू - आधारित शिक्षण प्रदान करतात असे म्हणता येईल.

मेंदूचा विकास व शिक्षण हे परस्पर संबंधित आहे. शिकण्याच्या किंवा जीवनानुभव घेण्याच्या क्रियेमुळे न्यूरॉन्सची नव्याचे जोडणी होत असते. विशिष्ट कलावधीत विशिष्ट अनुभवांसाठी मेंदू भुकेलेला असतो. या कालावधीला तांत्रिक भाषेत 'Windows of opportunities' 'संधींची गवाक्षे' किंवा 'learning

| संधींची गवाक्ष | वायरिंग विंडोज | सर्वोच्च विकास संधी |
|---|---|---|
| भाषा<br>ध्वनी<br>शब्द संग्रहंचा विकास | ४ - ८ महिने<br>४ - ८ महिने<br>० - २४ महिने | ८ महिने ते ६ वर्षे<br>८ महिने ते ६ वर्षे<br>२ ते ७ वर्षे |
| भावनिक बुद्धिमत्ता | ० - ४८ महिने | ४ ते ८ वर्षे |
| सामाजिक जवळीक | ० - २४ महिने | २ ते ५ वर्षे |
| स्नायू विकास | ० - २४ महिने | २ ते ५ वर्षे |
| विचार कौशल्ये | ० - ४८ महिने | ४ वर्षे ते १८ वर्षे (Puberty) |
| कारणे व परिणाम शोधणे | ० - १५ महिने | १५ महिने ते १८ वर्षे (Puberty) |
| इतर भाषा | ० - ६० महिने | ६ वर्षे ते १८ वर्षे (Puberty) |
| गणित व तार्किक विचार | ३ वर्षे ते ६ वर्षे | |

Windows असे म्हणतात. मेंदूची भूक भागवण्यासाठी तत्संबंधित अनुभवांचे खाद्य मोठ्या प्रमाणात मुलाला द्यावे लागते कोणत्या कौशल्याची 'संधींची गवाक्षे' केव्हा व किती काळापर्यंत उघडतात हे वरील तक्त्यावरुन समजेल.

या 'learning Windows ज्या विशिष्ट कालावधीत उघडतात त्या कालावधीमध्ये जर मुलाला ते ते अनुभव दिल्यास ते विशिष्ट कौशल्य आत्मसात करण्यास सोपे जाते व एकदा का ही गवाक्षे बंद झाल्यास ही कौशल्ये आत्मसात करण्यास अतिशय कठिण होऊन बसते. उदा. भाषेची संधीची गवाक्ष ४ ते ८ महिन्यापासून उघडतात. त्या काळात मुलाच्या कानावर अनेक भाषा पडल्या तर त्या सर्वच्या सर्व आत्मसात करु शकतो. हेच मोठ्या मुलांना किंवा प्रौढांना कठीण जाते किंवा अशक्य होत असते.

**आनंदी, उल्हासित वातावरणाचा आणि मेंदूचा परस्पर संबंध आहे.** अशा वातावरणात रक्तपुरवठा हा निओकॉर्टेक्सकडे होतो व त्यातून विचार शक्तीला चालना मिळून शिकण्याची प्रक्रिया प्रभावीपणे होत असते. भीती, धाक, मार, शिक्षा, चिंता या गोष्टी जर शाळेत किंवा घरात असतील तर निओकॉर्टेक्सकडचा सर्व रक्तपुरवठा मॅमेलियन मेंदूकडे सरकतो व भावनिक पातळीवर घसरण होऊन मुलाच्या भावना तीव्र होतात. अगदीच असहाय्य ताण निर्माण होतो तेव्हा जीवन मरणाच्या प्रश्नाभोवती कार्यरत असणाऱ्या सरपट मेंदूच्या पातळीवर घटना घडू लागतात. या वेळी विचार करणे दूरच, कोणतेच बौद्धिक वा शिकण्याचे काम होऊच शकत नाही. अशा वेळी ती क्रिया न करणे किंवा पलायन करणे याकडेच कल राहतो. या प्रक्रियेला Downshifting असे म्हणतात. 'हाताची घडी तोंडावर बोट' हा सार्वत्रिक विचार मुलांचे नुकसानच करत असतो. शिक्षा करुन किंवा मारुन अथवा धाक दाखवून मुलांकडून कोणतेच बौद्धिक काम होणार नाही हे पालक व शिक्षकांनी विचारात घ्यायला हवे.

**मेंदू आधारित शिक्षणासाठी पुढील बाबी विचारात घेतल्यास प्रभावी शिक्षण प्रक्रिया घडू शकेल.**

१) भरपूर गाणी, बडबड गीते, बालगीते व गोष्टी यांचा संग्रह पालक-शिक्षकांकडे असणे आवश्यक आहे.

२) मोकळे परंतु, सुरक्षित वातावरण हवे.

३) विनोद सांगणे व विनोद घडविण्यास प्रोत्साहन देणे (मोठे, मोठे ज्याचा अर्थ कळत नाही असे सुविचार बाल शाळांत किंवा प्राथमिक लावण्य-लिहिण्यापेक्षा, विनोद लिहावेत व विनोदी चित्रे लावावीत.)

४) शैक्षणिक ताण जाणवू द्यावा - छोट्या-छोट्या समस्या उभ्या करुन त्या सोडविण्याची आव्हाने पुढे ठेवावीत.

५) सुवास, सुगंध याचा वातावरण निर्मितासाठी प्रभावी वापर करणे.

६) भावनांची, विचारांशी सांगड घालणे.

७) मनन करणे, दीर्घ श्वास घेणे व भरपूर पाणी पिणे.

८) बाह्य पारितोषिके मर्यादित ठेवणे. कौतुकाचे शब्द व पाठीवर शाबासकी मुलाचा आत्मविश्वास प्रचंड वाढविते.

संदर्भ :- 1) 'Making Connections - Teaching & Human Brain' Renate & Geoffrey Caine

2) 'ABC' s of Human Minds' - Readers Digest

३) अर्थबोध पत्रिका- मेंदू संशोधन विशेषांक.

**विशाखा देशपांडे**

अभ्यासगट सदस्य- महाराष्ट्र बालशिक्षण परिषद

भ्रमणध्वनी - ९८२०१२६६५७

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर - माध्यमिक विभाग

माध्यमिक शाळा समूहातील सर्व शाळांमधून निवड करुन श्री. अशोक टिळक आणि सौ. मनीषा टिळक यांच्यातर्फे 'सरस्वती पुरस्कार' दिला जातो. अत्यंत मानाचा समजला जाणारा हा पुरस्कार २००५-०६ या वर्षीचा आपल्या शाळेला मिळाला. रु. २५००/- आणि प्रमाणपत्र असे त्याचे स्वरुप आहे.

पडवळ हायस्कूल तर्फे 'आदर्श शाळा' पुरस्कार २००५-२००६ पासून घोषित केला आहे. यंदा हा पुरस्कार आपल्याला मिळाला. रु. २५००/- हे पुरस्काराचे स्वरुप आहे. पारितोषिक वितरण समारंभ पी. जे. हायस्कूल, वाडा येथे १० एप्रिल ०६ रोजी संपन्न झाला.

'ठाणे महानगर कलाध्यापक' संघाने आंतरशालेय चित्रकला प्रदर्शन दि. ७,८ आणि ९ एप्रिल २००६ रोजी आयोजित केले होते. या प्रदर्शनात आपल्या शाळेतील ऋतुजा शिवाजी चंद्रराव (५ अ) हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

नाशिक जिल्ह्यातील 'मुल्हेर' या गावी ''प्राच्य विद्या अभ्यास संस्थेतर्फे'' आपल्या शाळेतील श्री. दीपक धोंडे दि. २८, २९ आणि ३० मार्च रोजी विखुरलेल्या प्राचीन हस्तलिखितांची जुळवणी करण्यासाठी गेले होते.

एड्स् नियंत्रणाचे कार्य करणाऱ्या 'दिशा फाउंडेशन' या संस्थेला आपल्या शाळेने रु. १००९३/- चा निधी गोळा करुन दिला.



प्रा. श्रीधर वि. मुंढे

## विधी महाविद्यालय

वि.प्र.मं.च्या टी.एम्.सी. विधी महाविद्यालयातील प्रा. श्रीधर वि. मुंढे जून २००५ मध्ये झालेल्या युजीसी नेट Criminology (गुन्हेगारशास्त्र) या विषयात उत्तीर्ण झाले. त्याबद्दल त्यांचे महाविद्यालयातर्फे विशेष अभिनंदन करण्यात आले आहे. प्राचार्या श्रीमती श्रीविद्या यांनी या विषयात 'नेट' उत्तीर्ण होणे अवघड असल्याचे सांगितले.

## सौ. ए.के.जोशी इंग्लिश मिडियम स्कूल, ठाणे.

**टिळक विद्यापीठ निकाल - २००५**

| इ. | परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी |
|---|---|---|
| ५ वी | २३ | २३ |
| ६ वी | १६ | १६ |
| ७ वी | १८ | १८ |

सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे -

| | | |
|---|---|---|
| ५ वी | अभ्यंकर आदित्य | ८९ |
| ६ वी | देशपांडे अपूर्वा | ८९ |
| | प्रधान तेजल | ८९ |
| | जाधव कृत्रिका | ८९ |

| | | |
|---|---|---|
| ७ वी | मुळे मालविका | १०० |
| | सुतार शर्वरी | १०० |

**माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल**

१९ फेब्रुवारी २००५ रोजी माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेतली गेली. ह्या परीक्षेसाठी ३५ विद्यार्थी बसले होते. सर्वच्या सर्व ३५ विद्यार्थी चांगल्या गुणांनी पास होऊन शाळेचा माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल १००% लागला. ५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. त्यांची नावे खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १) | ओजस गोहाड - | ६ वी |
| २) | ऋचा कारखानीस - | ७ वी |
| ३) | मालविका मुळे - | १६ वी |
| ४) | विराज संघवी - | २१ वा |
| ५) | प्रियल नागरे - | २२ वा |

शिक्षक - नीता शारदा, हरदीप कौर सुलार.

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्रा. वि.**

अमृत महोत्सवी वर्ष - शुभारंभ

चैत्र शुद्ध प्रतिपदा - दि. ३० मार्च २००६ शके १९२८

"इवलेसे रोप लावियले द्वारी
तयाचा वेलु गेला गगनावरी ॥"

चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १९२८ म्हणजेच ३० मार्च २००६ रोजी डॉ. बेडेकर विद्यामंदिर, प्राथमिक विभागास ७४ वर्षे पूर्ण होऊन ७५ व्या वर्षास प्रारंभ होत आहेत. हे अमृतमहोत्सवी वर्ष अतिशय आनंदाने व उत्साहाने साजरे करण्यात येणार आहे. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व बौद्धिक मूल्यावर आधारित असलेले विविध कार्यालय २००६-०७ या वर्षात साजरे करण्यात येणार आहेत. हा अमृत महोत्सव साजरा करण्याचे सौभाग्य आमच्या मुख्याध्यापिका सौ. कल्याणी वाघरे यांना लाभले आहे.

साडेतीन शुभमुहुर्तांपैकी गुढीपाडवा हा एक शुभमुहुर्त तसेच शाळेची सुरुवातही याच दिवशी झाली असल्याने या दुग्धशर्करा योगाची संधी साधून अमृत महोत्सवी कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, मा. श्री. श्री. वि. करंदीकर, मंडळाचे अन्य मान्यवर पदाधिकारी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक-शिक्षक, पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक - शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांच्या सहकार्याने व उपस्थितीत कार्यक्रमास सुरुवात झाली.

शाळेतील कुशल, कलाप्रेमी व उत्साही शिक्षकांनी विविध प्रकारच्या पानाफुलांच्या तोरणांनी तसेच विविध रांगोळ्यांनी शाळा सजवली होती. त्यामुळे एक प्रकारचे मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

प्रथम वि. प्र. मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. करंदीकर यांच्या हस्ते दिपप्रज्ज्वलित करण्यात आला. नंतर श्री. दिलीप जोशी (संस्थेचे सभासद), श्री. का. कु. मालुसरे (संस्थेचे माजी सभासद), सौ. नलिनी जोशी (सेवानिवृत्त मुख्याध्यापिका), सौ. कल्याणी वाघरे (मुख्याध्यापिका) यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करण्यात आले.



दीपप्रज्ज्वलन करताना श्री. श्री. वि. करंदीकर व श्री. दिलीप जोशी

सर्व विद्या, कला, शास्त्रे यांचे अधिष्ठान असलेली देवता श्री गणेश याच्या पूजनाने मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाली.

ॐ सहनाववतु । सह नौ भुनक्तु ॥
सह वीर्यं करवावहै ॥
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥

या शांती मंत्राच्या उच्च स्वरातील मंत्रघोषाने आजुबाजूचे वातावरण प्रसन्न व पवित्र झाले त्याच बरोबर उदक शांतीचाही धार्मिक विधी करण्यात आला. श्री. अतुल मांगल गुरुजी व त्यांचे सहकारी यांनी या धार्मिक विधीचे पौरोहित्य केले तर शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ. विजया भंडारे व त्यांचे पती श्री. तानाजी भंडारे यांनी पुजेचे यजमानपद स्वीकारले होते.

शेवटी बेडेकर विद्यामंदिर या ज्ञानपंढरीच्या कानाकोपऱ्यात व जमलेल्या सर्व सेवाभावी, ज्ञानपंढरीच्या वारकऱ्यांवर पुरोहितांनी उच्च स्वरातील मंगल वेदमंत्रांसह शुद्धोदकाचे अभिसिंचन करुन सर्वांच्या मंगलाची कामना केली.

श्री सरस्वतीची स्थापना, समोर सुंदर रांगोळी, होम हवन, विद्वान ब्राह्मण व त्यांचे मनाला आनंद देणारे मंत्रोच्चार, अगरबत्त्यांचा सुगंध, आपल्या धर्मगुरुंसमोर आदराने नतमस्तक होणारे सर्वजण यामुळे शाळेची वास्तू पवित्र गुरुकुलासारखी भासत होती.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**पुढील परिषद**

**आर्थिक गणित**

दि. २६ ऑगस्ट २००६

माहितीसाठी संपर्क - प्रा. आर. एस्. पोद्दार
गणित विभागप्रमुख, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालय**

***आगामी परिषद***

नोव्हेंबर २००६

माहिती तंत्रज्ञान विभाग संयोजित

**'लिनक्स, ठाणे २००६'**

*जोशी बेडेकर महाविद्यालय*

*पुढील परिषद*

**बायोएथिक्स्**

*अर्थात*

**जैवनीती**

*या विषयावर*

*ता. २४-२५ जानेवारी २००७*

*विद्या प्रसारक मंडळाचे*

**तंत्रनिकेतन**

***आयोजित***

*राष्ट्रीय परिषद*

**जीऑ-इन्फॉर्मेटिक्स्**

*ता. ८-९ डिसेंबर २००६*